
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०२३

## संपादकीय

### महिला शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी कर्वे

९ नोव्हेंबरच्या सकाळी माझ्या एका अभ्यासू मित्रांकडून मला एक संदेश आला. त्यात लिहिले होते की आज महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा स्मृतिदिन आहे. या संदेशाने माझ्या काही स्मृती चाळवल्या गेल्या. काही वर्षांपूर्वी महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या स्त्री शिक्षण संस्थेत व्याख्यान देण्याचे निमंत्रण मला आले होते. या भेटीत मी जेवढे दिले त्याहून जास्त माहिती मी तिथून घेऊन आलो. संस्थेचा पसारा खूपच मोठा होता. अनेक शैक्षणिक संस्था तिथे उभ्या राहिल्या होत्या. १८९६ मध्ये लावलेल्या रोपट्याला आलेल्या या फांद्या होत्या. प्रत्येक फांदी तेवढीच बळकट आणि ताजीतवानी दिसत होती. मागील अनेक वर्षांपासून स्त्री शिक्षणाचे महत्त्वाचे काम या संस्था करीत आहेत. या संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या अनेक महिलांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत उत्तुंग भरारी मारलेली आहे. त्यामुळे महर्षी कर्वे यांच्या कार्याची ओळख करून घेण्याची इच्छा मनात सहजच निर्माण झाली.

९ नोव्हेंबर १९६२ रोजी वयाच्या १०४ व्या वर्षी महर्षी कर्वे यांनी या जगाचा निरोप घेतला. त्याआधी आपल्या शतायुषी आयुष्याचे या मानवाने सोने केले. महिलांचे शिक्षण, त्यांचा उद्धार हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. या क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केली. म्हणून त्यांना 'महर्षी' असे संबोधिले जाते. भारत सरकारने त्यांच्या कार्याची दाखल घेऊन त्यांना 'भारत-रत्न' ही मानाची पदवी बहाल केली. महर्षी कर्वे यांनी शंभर वर्षांपूर्वी केलेल्या कामाची फळे आपण आज चाखत आहोत. आज महिलांनी अनेक क्षेत्रांत आपली क्षमता सिद्ध केली आहे. मागील महिन्यात नव्याने स्थापन झालेल्या 'गोंडवाना विद्यापीठा'ला भेट देण्याची मला संधी मिळाली. तिथे मला असे कळले की, एम. एससी. च्या वर्गात मुलांपेक्षा मुलींचीच संख्या जास्त आहे. शालांत परीक्षेचा निकाल जाहीर होतो तेव्हा देखील असे लक्षात येते की, गुणवत्ता यादीत मुलांपेक्षा मुलींचीच संख्या जास्त असते. हे खरोखरच चांगले चित्र आहे. त्यासाठी आपण महर्षी कर्वे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे.

महर्षी कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड या गावी झाला. कोकणात शालेय शिक्षण पूर्ण करून ते मुंबईला आले. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेच त्यांना फर्ग्युसन महाविद्यालयात

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)


गणित शिकविण्याचे काम मिळाले. जीवनाला स्थैर्य आले पण मनाला समाधान नव्हते. स्त्रियांना समाजात मिळणारी वागणूक पाहून त्यांना दु:ख होत असे. विशेषत: बाल विधवांचे हाल त्यांना पाहावत नसत. त्या काळात अतिशय कमी वयात मुलींची लग्ने लावून दिली जात. कर्मधर्मसंयोगाने तिच्या पतीचा मृत्यू झाला तर तिला जन्मभर विधवेचे जीवन जगायला लागत असे. या घातक सामाजिक प्रथांविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी बालविधवा आनंदी बाया हिच्याशी पुनर्विवाह केला. तसेच, विधवांना समाजात स्थान मिळावे यासाठी त्यांनी 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केला.

स्त्रियांना आपल्या पायावर उभे करायचे असेल तर त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले. त्यानुसार पुण्याजवळ असलेल्या हिंगणे गावात त्यांनी १८९६ मध्ये स्त्री शिक्षण संस्थेची स्थापना केली. हिंगणे इथेच त्यांनी १९०७ मध्ये 'महिला महाविद्यालयाची' स्थापना केली. या संस्थेत महिलांना 'शिशु संगोपन, गृहजीवन' तसेच 'आरोग्यशास्त्र' आदी विषय शिकवले जात. जसजसा काळ पुढे सरकत होता तसतसा या संस्थेचा विस्तार होत गेला. आज या परिसरात अभियांत्रिकी महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज, व्यवस्थापन शिक्षण देणारे महाविद्यालय असे अनेक विभाग आपल्याला पहायला मिळतात. हिंगणे स्त्री शिक्षण संस्था आता 'कर्वे स्त्री शिक्षण संस्था' या नावाने ओळखली जाते.

महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ असले पाहिजे असे महर्षी कर्वे यांना वाटू लागले. त्याबरहुकूम १९१६ मध्ये त्यांनी महिला विद्यापीठाची मुहूर्तमेळ रोवली. त्या विद्यापीठाचे नाव भारतीय महिला विद्यापीठ (Indian Women's University) असे होते. या विद्यापीठाला ठाकरसी कुटुंबाने आर्थिक मदत देऊ केली. म्हणून १९२० पासून त्या विद्यापीठाचे नामकरण 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) महिला विद्यापीठ' असे करण्यात आले. या विद्यापीठाचे मुख्य केंद्र मुंबई शहरातील चर्चगेट परिसरात आहे. ही जागा अपुरी पडू लागल्याने या विद्यापीठाने जुहू भागात एक विस्तीर्ण परिसर विकसित केला आहे. मुंबईबरोबरच पुणे शहरात देखील हे विद्यापीठ कार्य करीत आहे. तसे पाहिले तर, एस एन डी टी हे राज्य सरकारच्या अखत्यारीत येणारे विद्यापीठ आहे. परंतु हे विद्यापीठ देशाच्या कोणत्याही महाविद्यालयाला संलग्नता देऊ शकते. त्यामुळे या विद्यापीठाचा पसारा खूप वाढला आहे. आजच्या घडीला या विद्यापीठात आणि संलग्न महाविद्यालयात शिकणाऱ्या महिलांची संख्या ७०,००० हून जास्त आहे.

एस एन डी टी विद्यापीठातील अभ्यासक्रमामध्ये स्त्रीजीवनाशी संबद्ध अशा विविध विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये नर्सिंग तसेच अध्यापन यांचा समावेश आहे. तसेच संगणक शिक्षण, व्यवस्थापन या विषायांचा देखील समावेश करण्यात आला आहे. या विद्यापीठाचे ब्रीदवाक्य 'संस्कृता स्त्री पराशक्ती' असे आहे. या विद्यापीठातून शिक्षण घेऊन अनेक महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. नॅक समितीने विद्यापीठाचे मूल्यमापन करून 'अ' दर्जा बहाल केला आहे. विद्यापीठाच्या १९३९ च्या पदवीदान समारंभाचे अध्यक्षपद महात्मा गांधी यांनी भूषविले होते. १९४१ मध्ये जेव्हा या विद्यापीठाचा 'रजत महोत्सव' आयोजित करण्यात आला तेव्हा सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी अध्यक्षपद भूषविले. १९६६ मध्ये जेव्हा विद्यापीठाचा 'सुवर्ण महोत्सवी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला

(पृष्ठ क्र.२७ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष चोविसावे/अंक ११/नोव्हेंबर २०२३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) समान नागरी संहितेसाठी राज्याला प्रयत्नशील असायला हवे | प्रा. विनोद एच वाघ | २ |
| ३) जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर | डॉ. सुधाकर आगरकर | ४ |
| ४) लोकोत्तर कवी संत ज्ञानेश्वर | डॉ. आनंद कुलकर्णी | ७ |
| ५) पुस्तक परीक्षण - 'रे मना' | डॉ. अपर्णा कुलकर्णी | ९ |
| ६) तो मी नव्हेच ! | डॉ. रंजन गर्ग | १२ |
| ७) अद्‌भुत लोणार सरोवर आणि काठावरची चमत्कारिक मंदिरे ! | दिलीप नारायण वंडलकर | १९ |
| ८) शिवकाशी : शतायू उग्रमंगल, रौद्ररम्य फटाके उद्योगाची नगरी | प्रमोद वसंत बापट | २५ |
| ९) परिसर वार्ता | संकलित | २८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# समान नागरी संहितेसाठी राज्याला प्रयत्नशील असायला हवे

*जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे कोणत्याही गोष्टींची, नियमांची, सवलतींची जर हे आपले राष्ट्र, म्हणजे आपणच काटेकोरपणे समानता आणू शकलो तरच आपल्या राष्ट्राची प्रगती होईल. अन्यथा एकूण कठीणच आहे याबाबतचा हा प्रस्तुत लेख – संपादक*

समान नागरी संहिता किंवा युनिफॉर्म सिव्हील कोड जो संविधानाच्या अनुच्छेद ४४ मध्ये संकल्पित केला होता, तो त्याच संकल्पनेप्रमाणे लागू होईल याची शक्यता फार कमी आहे. संविधानाच्या अनुच्छेद ४४ प्रमाणे भारतातील सर्व नागरिकांसाठी एकच नागरी संहिता असावी व यामध्ये जाती, धर्म किंवा परंपरा यापैकी कशाचेच वर्चस्व नसावे अशी संहिता अपेक्षित होती. म्हणजे भारताच्या प्रत्येक नागरिकाचा विवाह, घटस्फोट, निर्वाहनिधी, दत्तक प्रक्रिया आणि वारसा हक्क हा एकसमान असावा. हे व्हायला हवे ही फार रास्त आणि वाजवी अपेक्षा आहे; पण हे असेच होईल हे मानणे वास्तवाला धरून नाही. जगातल्या कोणत्याही देशामध्ये नागरिकांना कायद्यापेक्षा त्यांच्या रूढी, परंपरा आणि धर्म अधिक प्रिय असतो. त्यामुळे अशा रूढी, परंपराना कायद्याद्वारे मान्यता देणे सहज शक्य होत नाही. समाज सुधारकांची गरज इथे जाणवते. समाज सुधारक, बुद्धीजीवी वाईट परंपरे विरोधात एक जनमानस तयार करतात, ज्या आधारे एखादा कायदा बनविणे व तो राबविणे सोयीचे होऊ शकते. १८२९ मध्ये सतीप्रथा बंदी कायदा बनविण्यापूर्वी राजा राममोहन रॉय यांना जनमानस तयार करावेच लागले, अशी अनेक उदाहरणे जगाच्या व भारताच्या इतिहासात सापडतील. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मुलनाच्या चळवळीनंतरच अंधश्रद्धेसंबंधी कायदा बनविण्यात आला होता, त्याचा स्वीकार करणे म्हणूनच सोपे झाले.

१९५० मध्ये समान नागरी संहिता लागू करता आला असता का, तर या प्रश्नाचे उत्तर हिंदू कोड बिलाला झालेल्या विरोधावरून समजून घेतले जाऊ शकते. आपण हे समजून घेतले पाहिजे की, समान नागरी संहिता असायलाच हवी, त्याचा विरोध करणे सभ्य समाजाचे लक्षण नाही, पण विरोध निर्माण तिथे होतो जेव्हा समान नागरी संहिता लादण्याचा प्रयत्न होतो. अनुच्छेद ४४ व्यवस्थित वाचल्यानंतर या संहितेचा स्वीकार सगळेच करतील पण लादलेले स्वीकारणार नाही याचा अर्थ कळून येईल. नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. 'प्रयत्नशील राहील' हा या अनुच्छेदाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. कोणत्या पक्षाची सत्ता होती किंवा आहे हा मुद्दा बाजुला ठेवला तरी, मागच्या ७३ वर्षांमध्ये समान नागरी संहिता असावी म्हणून काही प्रयत्न झाला आहे का? उत्तर नकारात्मक आहे. समान नागरी कायदा हा मुद्दा राजकीय झाल्यामुळे तो अमुक पक्षाचा आहे आणि तमुक पक्षाचा नाही या विभागणीमुळे समान नागरी संहितेसाठी कधी प्रयत्न करण्यात आले नाहीत. पुन्हा एकदा हे समजून घेतले पाहिजे की संविधानाला प्रयत्नशील असणे यातून काय अभिप्रेत आहे? खरं म्हणजे शासनाने योजना बनवून समान नागरी संहितेसाठीची सकारात्मक बीजे शाळा, महाविद्यालय व इतर सामाजिक योजनांतून पेरायला हवी होती. परंतु दुदैव असे की, हा मुद्दा फक्त राजकीय मंचावर निवडणुकीपुरताच उपस्थित करण्यात आला. 'प्रयत्नशील असणे' याचा अर्थ समान नागरी संहितेच्या बाजूने जनमानस तयार करणे असा होता. समाज सुधारक, बुद्धीजीवी यांच्या मदतीने हे सहज शक्य होण्यासारखे

होते. राजकीय पुढारी वेगळ्या कारणासाठी हा मुद्दा हाताळतात.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, समान नागरी संहितेशी भारतातील तीन मोठे घटक संबधित आहेत. हिंदू ज्यामध्ये आजच्या कायद्याप्रमाणे बौद्ध, जैन, शीख यांचाही समावेश होतो. सर्व हिंदू कायदे या चार धर्मियांना लागू आहेत. २०१२ मध्ये तर शीख धर्मियांसाठी 'आनंद विवाह कायदा' देखील बनविण्यात आला होता. कायद्याप्रमाणे हे सगळे हिंदू असले तरी या सर्व धर्मियांची विवाह पद्धती भिन्न आहे. अनेक हिंदू सप्तपदी संस्कार करत नाहीत, पण म्हणून त्यांचा विवाह काही बेकायदेशीर ठरत नाही. दुसरा घटक आहे अल्पसंख्यांक धर्मीय, यामध्ये मुस्लीम वगळता इतर धर्मियांना समान नागरी संहितेविषयी विरोधात किंवा समानार्थ काहीच मत मांडायचे नाही. आणि तिसरा घटक आहे आदिवासी समाज आणि आदिवासी राज्य, जे अनुच्छेद ३७१-अ प्रमाणे संरक्षित राज्य आहे, ज्यांना विशेष दर्जा प्राप्त आहे. समान नागरी संहितेच्या वास्तवा करिता तुम्हाला या तीन घटकांना समजावून सांगावे लागेल, शांततेने त्यांचे मन व मत परिवर्तन करावे लागेल, त्यांच्या शंका-कुशंका काही असतील तर त्या दूर कराव्या लागतील. हा प्रयत्नशीलपणा संविधानाला अपेक्षित आहे..

आज तरी संपूर्ण हिंदू समाज समान नागरी संहितेच्या बाजूने उभा आहे. ही संहिता काय आहे याची खात्रीलायक माहिती आहे आणि म्हणून हिंदू समर्थन करत असेल तर चांगलेच आहे, पण या संहितेबद्दल ठोस काहीच माहीत नसतांना समर्थन करणे योग्य नाही. तसेच, मुसलमान समाजाकडे या संहितेस विरोध करण्याची काही खात्रीलायक कारणे असतील तर त्यावर चर्चा होऊ शकते; पण फक्त विरोध करायचा म्हणून करायचा यालाही काही अर्थ नाही. हिंदू आणि मुसलमानांचे समान नागरी संहितेविषयीचे मत सर्वांना माहीतच आहे, त्याचा राजकीय नफा-नुकसानही समजण्यासारखे आहे, पण तिसरा घटक आदिवासी समाज आहे, त्याच्या मताविषयी कुणालाच जाणून घ्यायचे नाही आणि चर्चा करायची नाही, अशी परिस्थिती दिसत आहे. अनुच्छेद ३७१-अ प्रमाणे नागालँडमधील नागा धर्म आणि संस्कृतीस संरक्षित करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत समान नागरी संहिता देशभरात लागू करण्याची पहिली शर्थ असेल की, ३७१-अ रद्द करणे. असे करणे शक्य नसेल तर ही संहिता नागालँड सोडून संपूर्ण भारतात राबवावी लागेल. आज अस्तित्त्वात असलेले हिंदू कायदे, संविधानाच्या अनुच्छेद ३६६ (२५) प्रमाणे व्याख्या केलेल्या आदिवासींना लागू होत नाहीत.

भारतामध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे त्यांची सहमती आवश्यक आहे. मुसलमानांच्या विरोधाचे अनेक मुद्दे हे अज्ञानावर आणि हिंदूंचे समर्थन अवास्तव अपेक्षेच्या छायेत आकार घेत आहे. या संहितेच्या बाजुने इलेक्ट्रॉनिक आणि प्रेस मीडियाने ज्या पद्धतीने वातावरण बनवायला हवे होते तसे ते बनवले गेल्याचे दिसत नाही. उलट या मुद्द्यावर वातावरण कसे तापेल हाच प्रयत्न या माध्यमाने केल्याचा दिसतो. मघाशी सांगितल्याप्रमाणे राज्याने ज्या पद्धतीने प्रयत्नशील असायला हवे तसे दिसत नाही.

शेवटी एवढेच सांगायला आवडेल की, केंद्र शासनाने समान नागरी संहितेचा मसुदा जाहीर करावा व त्यावर नागरिकांची मते मागवावी, तेव्हाच त्या मसुद्याचे वैध समर्थन किंवा विरोध स्पष्टपणे दिसेल, तोपर्यंत हा फक्त राजकीय मुद्दा म्हणूनच बघितला जाईल.

**- प्रा. विनोद एच वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय
ठाणे


•••

# जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर

*आपल्याकडे हे नाही ते नाही अशी तक्रार आपण सतत करीत असतो. याउलट जे असेल ते घेऊन आणि जिथे आहोत तिथून निघून आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे यातच पुरुषार्थ आहे; हेच आपल्याला शेती विज्ञानात मोलाचे कार्य करणारे प्रतिथयश असे शास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या जीवनगाथेवरून कळते. – संपादक*

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर (George Washington Carver) हे मागच्या शतकातील एक प्रतिथयश असे शास्त्रज्ञ होते. शेती विज्ञानात त्यांनी मोलाचे कार्य केले. असे जरी असले तरी त्यांच्या बालपणात त्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. मेरी आणि गिलेस (Mery and Giles) या गुलाम मातापित्यांच्या पोटी त्याचा १८६४ साली जन्म झाला. त्यांच्या अचूक जन्मतारखेची नोंद कुठेही नाही. सोयीसाठी ती १ जानेवारी अशी घेतात. त्यांचे आई-वडील दोघेही मोझेस कार्व्हर (Moses Carver) या मालगुजाराकडे गुलाम म्हणून काम करीत होते. कार्व्हरने त्या दोघांना दुसऱ्या एका अमेरिकन माणसाकडून केवळ ७०० डॉलरला विकत घेतले होते. कार्व्हर यांच्या शेतावर राबणे आणि त्यांनी दिलेल्या तुकड्यावर जगणे एवढेच त्यांच्या नशिबी होते.

मेरी आणि गिलेस या गुलाम दांपत्याला दोन मुले होती; एक मुलगा आणि एक मुलगी. मेरी जेंव्हा तिसऱ्यांदा गरोदर राहिली तेव्हा गुलाम पळविणाऱ्या टोळीने गिलेसला पळवून नेले. जॉर्जच्या जन्माच्या वेळी त्यांचे वडील हजर नव्हते. तीन लहान मुलांना घेऊन त्याची आई मेरी कसेबसे दिवस काढत होती. तो एक आठवड्याचा असताना गुंडांनी त्याला, त्याची आई, भाऊ आणि बहीण या सगळ्यांना पळवून नेले. कार्व्हर यांनी त्यांचा शोध घेतला तेव्हा जॉर्ज आणि जेम्स हे दोन भाऊ त्यांना सापडले. त्यांची आई आणि बहिणीचा मात्र पत्ता लागला नाही. पोरके झालेल्या या दोन मुलांना मोझेस कार्व्हर आणि त्याची पत्नी सुझन (Susan) यांनी आसरा दिला. जॉर्ज आपली ओळख कार्व्हरचा जॉर्ज अशी करून देत असे. त्यावरून त्यांचे नाव जॉर्ज कार्व्हर असे पडले. नंतरच्या आयुष्यात त्यांना वाशिंग्टन नावाचे प्राचार्य भेटले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन त्याने आपले मधले नाव वाशिंग्टन असे घेतले. अशा प्रकारे या गुलाम पुत्राचे पूर्ण नाव जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर असे झाले.




**कार्व्हर दांपत्य**

मोझेस कार्व्हर हे मूळचे जर्मन होते. मिसोरी राज्यातील डायमंड ग्रूव्ह (Diamond Grove in Missouri State) येथे ते राहात असत. पोरक्या जॉर्जला त्यांनी आपल्या मुलासारखे वाढविले. त्यांची पत्नी सुझन हिने जॉर्जला घरीच लिहायला वाचायला शिकविले. जॉर्ज शिक्षणात हुशार होता. त्याला औपचारिक शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्या दांपत्याची इच्छा होती. परंतु त्यांच्या गावाजवळ असलेली कोणतीच शाळा या कृष्णवर्णीय मुलाला शाळेत प्रवेश देण्यास तयार नव्हती. त्यांच्या

गावापासून सुमारे १० मैलांवर असलेल्या निओशो (Niosho) या गावी कृष्णवर्णीय मुलांची एक शाळा होती. तिथे जॉर्जला पाठविण्याचा निर्णय कार्व्हर कुटुंबानी घेतला. अशा प्रकारे त्यांचे औपचारिक शिक्षण सुरू झाले. तेथे असलेल्या मारिया वॉटकिन्स (Mariah Watkins) या प्रेमळ बाईच्या छत्रछायेखाली त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यापुढील शिक्षणाची सोय तिथे नसल्याने त्याला ते गाव सोडून जावे लागले. जड अंतःकरणाने त्याने मारिया वॉटकिन्स या बाईचा निरोप घेतला. तेव्हा त्या बाईने जॉर्जला सांगितले, 'शिकून खूप ज्ञान मिळव आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी कर.' हा सल्ला त्याने जन्मभर लक्षात ठेवला.

अनेक टक्केटोणपे खात जॉर्जने आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. कित्येक माध्यमिक शाळांनी तो कृष्णवर्णीय आहे एवढ्याचसाठी त्याला प्रवेश नाकारला. सरतेशेवटी त्याला कन्सास राज्यातील मिनियापोलिस (Minneapolis, Kansas State) या शहरातील एका शाळेत प्रवेश मिळाला. तिथून त्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर सुरू झाली महाविद्यालयीन शिक्षणासाठीची धडपड. या कामात देखील त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. शेवटी १८९० मध्ये त्याला आयोवा राज्यातील इंडियानोला (Indianola, Iowa State) या गावातील सिंप्सन कॉलेज (Simpson College) मध्ये प्रवेश मिळाला. तिथून तो आयोवा स्टेट शेतकी महाविद्यालयात (Iowa State agricultural University) गेला. त्यांची हुशारी पाहून तेथील प्राध्यापकांनी त्याला पदव्युत्तर शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले. १८९६ साली त्याने शेती विषयातील पारंगत ही पदवी प्राप्त केली.

अलाबामा राज्यातील तुस्केजी (Tuskegee, Alabama State) या शहरात तुस्केजी इन्स्टिट्यूट नावाची एक शिक्षण संस्था होती. बुकर टी. वाशिंग्टन (Booker T. Washington) हे त्या संस्थेचे प्रमुख होते. त्यांनी जॉर्जला त्यांच्या संस्थेतील शेती विभागात काम करण्यासाठी पाचारण केले. पुढील ४७ वर्षे ते याच संस्थेत शिकविण्याचे आणि संशोधनाचे कार्य करीत राहिले. याखेरीज समाजकार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. त्यांचे शिक्षण होईपर्यंत गुलामगिरी विरुद्ध अमेरिकेत कायदा करण्यात आला होता. कृष्णवर्णीय गुलामांना मुक्त करून त्यांना आपल्या पायावर उभे राहता यावे यासाठी प्रत्येक कुटुंबाला थोडी शेतजमीन देण्यात आली होती. असे जरी असले तरी अनेक कुटुंबांची आर्थिक स्थिती हालाखीची होती. त्यांच्या मुलांना पुरेसा पौष्टिक आहार मिळत नव्हता. जॉर्जने आपले लक्ष याच समस्येवर केंद्रित केले.



**प्रयोगात रमणारे प्राध्यापक**

जॉर्जच्या असे लक्षात आले की, त्याचे शेतकरी बांधव आपल्या शेतीतून वर्षानुवर्षे एकच पिक घेत आहेत. विशेषत: कापूस पिकविण्याकडे त्यांचा कल होता. कापसाला लागणारे घटक वर्षानुवर्षे जमिनीतून काढून घेतले जात असल्याने ते घटक कमीकमी होत असत. त्यामुळे पिकाचा उतारा कमी यायचा. यासाठी त्यांनी पिक बदल (Crop Rotation) ही पद्धत सुचविली. विशेषत: नायट्रोजन स्थिरीकरण (Nitrogen fixation) करणारी पिके शेतकऱ्यांनी मधून मधून लावावित असे त्यांनी सुचविले. त्याचबरोबर पौष्टिक आहार मिळावा यासाठी शेंगदाण्याचे पिक घेण्याचा सल्ला त्यांनी शेतकरी

बांधवांना दिला. शेंगदाण्यात प्रथिने आणि स्निग्ध पदार्थ पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात. ते खाण्याने आपल्या शरीराची या दोन महत्त्वाच्या घटकांची गरज भागविली जाते. 'शेंगदाणे खा' हा सल्ला सर्वसामान्य जनतेला रूचण्यासारखा नव्हता. म्हणून त्याने शेंगदाण्याचे अनेक पदार्थ बनवून दाखविले आणि त्यांचा शेतकरी कुटुंबात प्रसार केला. ते स्वतः तिस्कोनी येथे राहात असत. त्यावेळेस आजच्या सारखी संदेश वाहनांची सुविधा नव्हती. म्हणून ते घोड्याची बग्गी घेऊन स्वतः खेड्यापाड्यात जात असत. त्याला जेसप बग्गी (Jesup Wagon) असे म्हणायचे. कारण ती खरेदी करण्यासाठी न्यू यॉर्क येथील एक दानशूर केचम जेसप (Ketchum Jesup) यांनी आर्थिक सहाय्य केले होते.




**फिरती प्रयोगशाळा**

आपल्या संशोधन आणि सामाजिक कार्याने जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर हे नाव विसाव्या शतकाच्या सुरुवातीला चांगलेच प्रसिद्ध झाले. अमेरिकेतील प्रतिष्ठित व्यक्ती बरोबर त्यांची ऊठबस सुरू झाली. अमेरिकेचे अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट (Theodore Roosevelt), केल्विन कुलिज (Kelvin Coolidge) आणि फ्रँकलिन रूझवेल्ट (Franklin Roosevelt) यांनी त्याला भेटायला बोलावले. अमेरिकेतील प्रसिद्ध उद्योगपती हेन्री फोर्ड (Henry Ford) यांनी त्यांना मिशिगन राज्यात आयोजित करण्यात आलेल्या एका मोठ्या संमेलनात भाषण देण्यासाठी पाचारण केले. तेव्हापासून या दोघांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. जीवनाच्या उत्तरार्धात त्याने तुस्केजी या त्यांच्या कर्मभूमीत एक उत्तम असे संग्रहालय उभारले. त्यांच्या मिळकतीतून ६०,००० डॉलर देऊन त्यांनी जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर प्रतिष्ठान (George Washington Carver Foundation) स्थापन केले. हे प्रतिष्ठान शेती संशोधनात मोलाची कामगिरी बजावित आहे.




**जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर संग्रहालय**

५ जानेवारी १९४३ रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी या महान संशोधकाने इहलोकीची यात्रा संपवली. तुस्केजी विद्यापीठाच्या आवारात बुकर वाशिंग्टन यांच्या शेजारीच त्यांना पुरण्यात आले. त्यांच्या थडग्यावर लिहिलेला मजकूर असा आहे He could have added fortune to fame, but caring for neither, he found happiness and honour in being helpful to the world. त्याच वर्षी त्यांच्या जन्म स्थळी जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर राष्ट्रीय स्मारक (George Washington University National Monument) उभारण्यात आले.

**कार्व्हर राष्ट्रीय स्मारक**

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी कधीही विवाह केला नाही. त्यामुळे त्यांचे वंशज या जगात नाहीत. परंतु

(पृष्ठ क्र. ८ वर)

# लोकोत्तर कवी संत ज्ञानेश्वर

*दिनांक ५ ऑक्टोबर अर्थात भाद्रपद कृष्ण षष्ठी रोजी ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंती साजरी करण्यात आली या निमित्ताने ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेवर प्रकाश टाकणारा डॉ आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

मोठमोठ्या लेखक/समीक्षकांनी मला माझ्या खुजेपणाची सतत जाणीव करून दिली आहे. कधी विचार, तर कधी भाषेच्या अंगाने असा अपुरेपणा मला जाणवत राहिला आहे. अगदी असंच ज्ञानेश्वर करतात. सरळ बालवाडीत आणून बसवतात! चक्क मराठी शिकवतात! फरक इतकाच की, इतर गुरुजींसारखे ते रागावत नाहीत, कमीपणाची जाणीव होऊ देत नाहीत. जवळ घेऊन, हाताला धरून धुळाक्षरे गिरवायला लावतात. जणू वर्गात बसवून अतिशय प्रेमाने शिकवतात. त्यांच्या या शिकवण्यात कुठेही आक्रमकता नाही, धसमुसळेपणा नाही, अहंभाव नाही. 'आनंदामोदबहुळ। सात्विकाचे मुकुळ। ते उमललें अष्टदळ। ठेऊं वरी' असं शब्दलाघव पसरवतात. शिकवण्यात मनाला संतोष होईल अशी सलगी ठेवतात, शिकावं म्हणून साखरेहून गोड शब्दांत विनवणी करतात. 'जैसें मुळसिंचनें सहजें। शाखापल्लव संतोषती।।' असा त्यांचा विश्वास असल्याने मुळापासून शिकवायला सुरुवात करतात. काय लिहावं आणि कसं लिहावं हे शिकवतात. किती नवे शब्द, किती रंगांची, गंधांची उधळण! अक्षरांना 'गोड करावं' तर ज्ञानेश्वरांनीच. शिकवण्यात कुठेही कोरडेपणा नाही. त्यांचे शब्द मनात उतरतात, मेंदूत कोरले जातात. शिकवण्यासाठी ना वेळेचं बंधन, ना अभ्यासक्रम, ना परीक्षा, ना प्रमाणपत्र, ना कसली फी. म्हणून मग आकाश मंडप, पृथ्वी आसन अशा विराट प्रतलावर ते शिकवतात. मग श्रवणसुखाच्या मांडवीं । विश्व भोगी माधवीं । तैसी सासिन्नली बरवी । वाचावल्ली।। असा शब्दांना बहर येतो. वर्ग म्हणजे श्रवणसुखाचा मांडव. त्यात ज्ञानेश्वरांच्या व्याख्यानाची वेल अशी बहरते की, मांडवात साक्षात वसंतऋतुच अवतरतो. आपण काय प्रतीचे शिक्षक आहोत याची ज्ञानेश्वरांना तीव्र जाणीव आहे. पण ही जाणीव दुहेरी आहे. आपण वर्गशिक्षक नाही तर 'लोकशिक्षक' आहोत हे त्यांना माहिती आहे. आणि दुसरं म्हणजे; आपण फक्त परीक्षेत पास होता येईल असं शिकवत नाही, तर मराठीत अजोड असा काव्यग्रंथ लिहितो आहोत याचं भान आहे. मग ते एकाचवेळी नम्रतेने हात जोडतात आणि काठोकाठ आत्मविश्वासाने ज्ञानाची रास उभी करतात. 'आता तेणेंचि पसाये। तुम्हां संतांचे मी पाये' अशी विनम्रता दाखवतात, तशीच 'अमृताहूनही गोड आणि अवीट अक्षरे मिळवून दाखवेन' असा अभिमान व्यक्त करतात. अशी प्रतिभा आणि प्रेमाची कोंदाकोंदी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. यातली गंमत ही की, विशीचं कोवळं तेज हे सगळं करतंय!




ज्ञानेश्वरी म्हणजे अव्वल दर्जाचा काव्यप्रबंधच आहे. त्यासाठी ज्ञानेश्वरांनी मार्गदर्शक म्हणून त्यांच्या गुरूची निवड केली आहे आणि परीक्षक म्हणून श्रोत्यांची

निवड केली आहे. विशेष म्हणजे आरंभापासूनच श्रोत्यांना विनंती करत आणि 'माझ्या बोलण्याकडे लक्ष द्या' अशी अट टाकत ज्ञानेश्वर पुढे जातात. अशी प्रबंध परीक्षा पास झालेला प्रतिभावंत शिकवायला लागतो तेव्हा ज्ञानभांडार खुले होते. वरताण म्हणजे हे ज्ञान लावण्यवती आहे आणि त्यात जिव्हाळा आहे. ज्ञान हे प्रेम आणि सौंदर्य घेऊन आलेलं आहे. एका क्षणी हा मोठाच शब्दप्रपंच आहे याची त्यांना जाणीव होते – हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें । गगन मुठीं सुवावें । मशकें केवीं।। म्हणजे, 'सूर्याला कसे उजळणार? आणि चिलटाला त्याच्या मुठीत आकाश कसे घेता येणार? तसा आपण सांगत असलेला तत्त्वार्थ अवघड आहे' असं ते म्हणतात. बरं; नुसतं प्रमेय सांगायचं नाही, तर ते कवितेतून सांगायचंय. हे अवघडपण सांगताना ज्ञानेश्वर स्वत:च लहान मूल होतात– जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ।। पण मग दुसऱ्या क्षणी आपण प्रतिभावंत कवी आहोत याची त्यांना जाणीव होते आणि त्यांचं रूप बदलतं. मग 'बोली अरूपाचे रूप दावीन' असा अलौकिक दावा ते करतात. असा सर्वांग सुंदर शिक्षक शिकवतो तेव्हा आपली आपल्याला ओळख पटतेच पण विश्वाचे आर्त आपल्या मनी प्रकटते!

ज्ञानेश्वर वात्सल्य असलेले बुद्धिमान शिक्षक आहेत आणि हीच शिक्षक असण्याची कसोटी आहे !


**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय
वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

(पृष्ठ क्र. ६ वरून – **जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर**)

समाजसेवेचा त्यांनी ठेवलेला वसा आपल्याला सतत प्रेरणा देत राहील. ते असे म्हणायचे Start from where you are and start with what you have. याहून अधिक मोलाचा सल्ला काय असू शकेल. आपल्याकडे हे नाही ते नाही अशी तक्रार आपण सतत करीत असतो. याउलट जे असेल ते घेऊन आणि जिथे आहोत तिथून निघून आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे यातच पुरुषार्थ आहे हेच आपल्याला जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या जीवनगाथेवरून कळते.




**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे – ४२१२०४

•••

## पुस्तक परीक्षण - 'रे मना'

*मानसिक आंदोलनांमधील काही प्रश्न, विचार, भीती, शंका यांनी पुष्कळशा व्यक्तींचं आयुष्य गुरफटलेलं असतं. परंतु त्यातून सुटकेचे देखील काही मार्ग आहेत. अशा विषयाबाबत 'मनाला' केंद्रभूत ठेवून डॉ. सुचित्रा नाईक यांनी लिहिलेल्या पुस्तकाबाबत - संपादक*




''समुपदेशन? छे... आम्हाला त्याची गरज नाही'', ''समुपदेशन हे पाश्चात्त्यांचं फ्याड आहे. आम्हाला आमचं मन सांभाळता येतं'', मनाचे एवढे चोचले काय पुरवायचे? अशा मिथकांभोवती फिरणारी भारतीय मानसिकता आणि समुपदेशनाच्या बाबतीत असलेला पारंपरिक, टिपिकल आणि नकारात्मक असा भारतीय दृष्टिकोन आता संपूर्णपणे बदलत असून, वेगाने धावणाऱ्या जीवन क्रमात शरीराबरोबरच मनाची ही दुखणी वाढली असून, त्याला देखील देखभालीची गरज आहे हे आता भारतीय समाज - मन हळूहळू स्वीकारू लागलंय. मनाचा रोग किंवा मानसिक आरोग्य हे शब्द किमान मध्यमवर्गासाठी तरी परवलीचे झाले असून, समुपदेशकाच्या बरोबर बसून, चर्चा करून आपण मन:स्वास्थ टिकवू शकतो किंवा फारच झालं तर गोळ्या- औषधाने देखील मन:स्वास्थ्य टिकवता येते हे समुपदेशनाच्या तंत्रानं यशस्वीपणे सिद्ध करून दाखवले आहे. अर्थात समुपदेशनाच्या पद्धती आणि त्याचा उगम पाश्चिमात्य देशांमध्ये झालेला असला आणि भारतीय लोकांच्या बाबतीत समुपदेशन आणि त्याच्या पुढची पायरी म्हणजे क्लिनिकल ट्रीटमेंट या गोष्टी तुलनेने नव्या असल्या तरी देखील आज समुपदेशाचे तंत्र आणि समुपदेशन हा व्यवसाय म्हणून देखील भारतीय जनमानसात हळूहळू स्थिरावतोय आणि समुपदेशनाच्या बाबतीतली जुनी मिथकं आणि अर्धसत्य हळूहळू गळून पडताना दिसतात. विशेषत: कोविड महामारीच्या काळात आणि कोविडच्या नंतरच्या काळात मानसिक अनारोग्य आणि मानसिक असंतुलनाची स्थिती अनेकांनी जवळून अनुभवली आणि समुपदेशनानेच यावर उपाय निघू शकतो याची लोकांना खात्री पटली. परंतु विशिष्ट परिस्थितीतच नव्हे, तर एरवी सुद्धा सामान्य परिस्थितीमध्ये कुठल्यातरी कारणाने मानसिक समतोल ढासळू शकतो आणि अशावेळी समुपदेशक तुमचा मित्र, तत्त्वज्ञ, वाटाड्या अशा रूपात तुम्हाला सहाय्य करू शकतो हे अनेकांच्या अनुभवांतून दिसून आले.

याच संबंधाने 'समुपदेशकाच्या नजरेतून' अशा प्रकारचा दृष्टिकोन ठेवून त्या पद्धतीचे अनुभव कथन करणारं एक ताकदीचं पुस्तक अशातच वाचनात आलं. ठाण्याच्या जोशी बेडेकर कला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉक्टर सुचित्रा नाईक या पुस्तकाच्या लेखिका असून प्राचार्य, प्राध्यापिका, समुपदेशक, कौटुंबिक स्तरावर

---

तेव्हा तुमचे ओझे पूर्वीपेक्षा हलके होते हे लक्षात ठेवा !

एक पत्नी आणि आई अशा अनेक भूमिका पार पाडणाऱ्या सुचित्रा मॅडम यांचा लेखिका म्हणून परिचय या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांना होतो. हे पुस्तक अगदी पहिल्या पानापासून आपल्या मनाचा ठाव घेते. कारण हे पुस्तक तुमच्या-आमच्या प्रत्येकाच्या मनाबद्दलचं आहे आणि म्हणून पुस्तकाच्या नावातच 'रे मना' अशी मनाने मनाला घातलेली साद आपले लक्ष वेधून घेते. तसंच या पुस्तकाचं दुसरं बलस्थान म्हणजे सुरुवातीलाच वाचनात येणारी अत्यंत पूरक अशी ललित अंगाने लिहिलेली तगडी प्रस्तावना. वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मानवी मन कसं हेलकावे घेत राहातं आणि मानवाच्या भावभावना, प्रतिसाद, प्रत्यक्ष कार्य, इतरांशी होणारं वर्तन या सगळ्यांवर मन कसं गारूड करतं आणि तरीही ते स्वतः कसं स्वच्छंद असतं याची अतिशय सुंदर अशी ललित मांडणी श्री. प्रवीण टोकेकर यांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत केली आहे.

या पुस्तकाचा थोडक्यात आशय असा की, महाविद्यालयात समुपदेशनाचं युनिट सुरू करून, महाविद्यालयातल्या 'टीनेजर' या वयोगटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्या सोडवण्यासाठी, त्यांना समुपदेशनाच्या सहाय्याने मदत करणे या उद्देशाने कार्य करणाऱ्या प्राध्यापक समुपदेशकाच्या अनुभवांचं कथन. परंतु हे अनुभव कथन करत असताना लेखिकेने समुपदेशन तंत्राचे सिद्धांत हे अत्यंत सोप्या आणि कमीत कमी शब्दांत वाचकांना सहज समजतील अशा पद्धतीने मांडले आहेत आणि त्याशिवाय समुपदेशनाच्या मार्गावर भेटलेल्या विविध व्यक्ती, त्या व्यक्तींच्या मानसिक समस्या, त्यांना आलेले अनुभव यांच्यावर जास्त भर देऊन त्यांचा जीवनप्रवास या पुस्तकातून मांडला आहे. या पुस्तकाची भाषा ही अत्यंत सोपी सुटसुटीत आणि काल सुसंगत अशी असल्याने पुस्तकभर महाविद्यालयीन तरुणांच्या तोंडी असणारी आधुनिक मराठी आणि प्रचलित असणारे इंग्रजी शब्द यांची रेलचेल जाणवते. या पुस्तकाचं सगळ्यात महत्त्वाचं बलस्थान म्हणजे आशयाची सुसंगत मांडणी, अत्यंत चपखल अशा शब्दांची निवड आणि छोटी परंतु प्रभावी अशी वाक्यरचना. लेखिकेने अनुभव कथन अशा स्वरूपाचा फॉरमॅट वापरला असला तरी देखील या पुस्तकातील प्रसंग हे संवाद या स्वरूपात आपल्यासमोर येतात आणि वाचक नकळत शुभार्थी आणि समुपदेशक यांच्या अनुभवाचा एक भाग होऊन जातो. शुभार्थींच्या मानसिक समस्या या आपल्याच आसपास असणाऱ्या व्यक्तींच्या समस्या आहेत आणि कधीतरी आपण सुद्धा अशाच प्रसंगातून गेलो आहोत याची लख्ख जाणीव वाचकांच्या मनात निर्माण होते. कित्येकदा पुस्तक वाचताना सविता, शेखर या व्यक्तींच्या समस्यांची तीव्रता बघून सहृदय वाचकाच्या डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहात नाही.

अर्थात महाविद्यालयीन तरुण तरुणींचं भावविश्व, त्यांना भेडसावणाऱ्या मानसिक समस्या यांचे स्वरूप मुंबईसारख्या महानगरीय अवकाशात झपाट्याने बदलत असलं, तरीदेखील एक शिक्षक समुपदेशक किती प्रभावीपणे त्यांच्या समस्या सोडवू शकतो याचा एक आदर्श वस्तुपाठ या लेखिकेच्या माध्यमातून वाचकाच्या समोर येतो आणि प्रत्येक व्यक्तीने शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याकडेही तेवढेच लक्ष दिले पाहिजे असा एक महत्त्वाचा संदेश या पुस्तकातून मिळत राहतो. समुपदेशकाने काय करायला हवे आणि काय करायला नको याची अत्यंत सुस्पष्ट कल्पना या पुस्तकातून मिळते आणि समुपदेशनाची प्रक्रिया ही प्रत्येक व्यक्तीसाठी आणि व्यक्तींच्या मानसिक संतुलनासाठी कशी सहाय्यभूत होऊ शकते याचा अंदाज या पुस्तकाच्या वाचनातून येतो. या पुस्तकातील शुभार्थींच्या जीवनातील काही प्रसंग हे कमालीच्या तरलतेने आणि संवेदनशीलतेने वाचकांच्या समोर येतात आणि, 'समुपदेशकाने तटस्थपणे

शुभार्थींच्या वर्तनाकडे पाहिले पाहिजे असा संकेत असला तरीही महाविद्यालयीन अवकाशात विशिष्ट अशा शुभार्थी विद्यार्थ्यांच्या चुकांकडे तटस्थपणे पाहणे मला जमले नाही' हा लेखिकेने दिलेला स्वच्छ निर्वाळा मनाचा ठाव घेतो. संपूर्ण पुस्तकात समुपदेशनाचे सिद्धांत, परदेशात या पद्धतीवर झालेले प्रयोग, त्यातील सुधारणा याची अतिशय प्रभावी शब्दांत मांडणी दिसून येते आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे समुपदेशनाच्या संबंधीचे बोजड मानसशास्त्रीय शब्द टाळून लेखिकेने पुस्तक अधिक वाचनीय करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. प्रसंग आणि अनुभव कथनावर भर असल्यामुळे पुस्तक वाचताना हे समुपदेशनाच्या संबंधीचे पुस्तक आहे असे एकदाही वाटत नाही. सिद्धांत, अनुभवकथन आणि त्याचे कथारूप प्रकटीकरण असे बेमालूम रसायन हा या पुस्तकाच्या रचनेचा गाभा होय. या पुस्तकाच्या मांडणीचे आणि विषय वस्तूचे नवनीत म्हणजे या पुस्तकातील शेवटचे प्रकरण होय. झेन तत्त्वज्ञान आणि त्याचा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी असलेला संबंध आणि मानसिक शांततेतून व्यक्ती – जीवनाचा उत्कर्ष यासंबंधीचे विवरण या शेवटच्या प्रकरणात देऊन समुपदेशनाच्या चर्चेचा कळसाध्याय या प्रकरणात गाठला गेला असे खचितच म्हणता येईल.

ठाण्याच्या 'शारदा प्रकाशनाने' प्रसिद्ध केलेले हे १६७ पानांचे पुस्तक म्हणजे समुपदेशनाशी संबंधीत तथाकथित भारतीय मानसिकतेच्या बदलाचे सामाजिक आणि शैक्षणिक परिघात पडलेले प्रतिबिंब आहे असे म्हणावे लागते. एक संवेदनशील आणि तंत्र कुशल समुपदेशक समाजासाठी किती प्रभावीपणे उपयुक्त ठरू शकतो याची जाणीव या पुस्तकाच्या वाचनातून झाल्याशिवाय राहत नाही. शैक्षणिक क्षेत्रापुरते बोलायचे झाल्यास प्रत्येक महाविद्यालयाला अशा तंत्र कुशल आणि प्रभावी समुपदेशकाची गरज आहे आणि भावी पिढ्यांना मानसिक संतुलन राखण्यास मदत होण्यासाठी शैक्षणिक समुपदेशन हे शालेय स्तरापासूनच किती आवश्यक आहे याची लख्ख जाणीव हे पुस्तक करून देते. पालक, शिक्षक, विद्यार्थी अशा सर्व घटकांनी मानसिक आरोग्य, समुपदेशनाची गरज आणि समाजाची भविष्यातील दिशा यावर वारंवार विचार करायला हवा आणि त्यासाठी समुपदेशनाच्या माध्यमातून नकारात्मकता कमी करून एक सकारात्मक, सशक्त आणि सक्षम पिढी घडवण्यास काय करता येऊ शकते याची दिशा या पुस्तकातून मिळते.

अर्थात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाच्या कार्यात आलेले अनुभव हा या पुस्तकाचा विषय असल्याने शालेय समुपदेशन, वैवाहिक समुपदेशन, करिअर समुपदेशन या इतर प्रकारांची फारशी चर्चा या पुस्तकात होत नाही, परंतु ते सहाजिकच म्हणायला हवे. असे असले तरी देखील प्रस्तुत लेखकाप्रमाणेच इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या समुपदेशकांनी स्वतःचे अनुभव कथन करणारी अशी पुस्तके अधिकाधिक लिहायला हवीत असे मात्र वाटून जाते. प्रस्तुत लेखिकेने हा तथाकथित अवघड विषय अत्यंत सोप्या शब्दात आणि प्रभावीपणे मांडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन आणि हा विषय इतक्या ताकदीने समोर आणल्याबद्दल त्यांचे आभार! भविष्यात अशीच उत्तम साहित्य निर्मिती त्यांच्याकडून घडो आणि त्यांचे कार्य समाजासाठी अधिकाधिक उपयुक्त ठरो अशा शुभेच्छा!

**– डॉ. अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवीयर्स महाविद्यालय, मुंबई
७७६८०२७६५८

●●●

# ती मी नव्हेच !

*डॉ. रंजन गर्ग हे विज्ञान-कथा लिहिणारे एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व. काहीशा काल्पनिक परंतु विज्ञान-सूत्रांच्या आधारे त्यांनी स्वतःच्या कल्पना-शक्तीला वाट मोकळी करून दिले हे लेखक म्हणून अत्यंत महत्त्वाचे. त्यापैकीच एक कथा - संपादक*

'हिंदुस्तान म्हणे स्वातंत्र्याची शंभरी साजरी करतो आहे ! वा, काय दिवे लावले असे आम्ही शंभर वर्षांत? हिंदुस्तानचा गेल्या सहाशे वर्षांचा इतिहास बघा म्हणा जरा ! पानिपतचे एक युद्ध सुद्धा जिंकता आलं नाही आम्हाला. १५२६ साली पहिल्या युद्धात बाबर घुसला, १५५६ साली दुसऱ्या युद्धात अकबर घुसला आणि १७६१ साली तर पेशव्यांनी कहरच केला. उत्तर भारताचा ना इतिहास माहिती, ना भूगोल माहिती, ना सपाट युद्धभूमीवरील युद्ध कौशल्याची माहिती! एवढे बाजार भुणगे घेऊन कुठे युद्धाला निघत असतात का ? भारतीयांना १७५७ साली प्लासीची लढाई जिंकता आली नाही, ना १८५७ साली इंग्रजांच्याविरुद्ध यशस्वी उठाव करता आला. १८१८ साली तर भीमा कोरेगावची लढाई हरून इंग्रज भारतात चांगलेच प्रस्थापित झाले. शंभरीच्या निमित्त कशाची यशोगाथा गायची ?

अंधश्रद्धा, गरिबी, भूकबळी यांनी बरबटलेल्या या देशात विज्ञानाला कुठे स्थानच नव्हते ! शांततेची आणि भक्तीची गाथा वाचून कुठे स्वातंत्र्य मिळत असते का? शांतीच्या मार्गाने कुठे स्वतःचे संरक्षण करता येते? धूर्त इंग्रजांनी शांततेची फक्त खिल्ली उडवली. आम्ही भारतीय स्वातंत्र्याच्या बदल्यात चक्क एका अनावश्यक देशाची निर्मिती केली! आणि करोडो लोकांची कत्तल झाली. आपलं म्हणावं असं आम्ही आजपर्यंत जगाला भारतीय म्हणून काय देऊ शकलो आहोत ? सांगाना माझ्या भारतीय बांधवांनो. मी मागे वळून पाहतो तेव्हा सगळाच अंधार दिसतो आहे मला. मला आता हा भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास पुन्हा नव्याने लिहून काढावा लागणार आहे.'

सत्तरीतले सामाजिक शास्त्राचे गाढे अभ्यासक व एक आदरणीय इतिहास तज्ज्ञ डॉ. अपस्तंभ आपला डोळ्यांवरचा सोनेरी काडीचा चश्मा सारखा वर-खाली करत वेड्यासारखे बोलत सुटले होते. त्यांना सगळे विद्यार्थी आदराने 'अप्पासाहेब' नावाने ओळखत असत. संपूर्ण व्यासपीठच अस्वस्थ झालं होतं. आयोजक तर, 'या देशभक्ताला आज झालंय काय ?' म्हणून अवाक् झाले होते. आप्पासाहेबांना अनेक सूचना देऊन सुद्धा ते ऐकायला तयार नव्हते. स्वातंत्र्याची शंभरी साजरी करण्यासाठी आप्पासाहेबांचे व्याख्यान ऐकायला हजारो नागरिक, आणि अभ्यासक भारताच्या विविध राज्यांतून मोठ्या आशेने आले होते. सभागृह गच्च भरलेले होते. आणि जे होऊ नये तेच घडले.

सभागृहातील चारही दरवाजांतून पोलिसांचा फाटा सरळ व्यासपीठावर अवतरला. पोलिस ऑफिसरने आप्पासाहेबांना ताब्यात घेण्याचे आदेश दिले. आणि पोलिस आप्पासाहेबांच्या दंडाला पकडून पोलिस चौकीत घेऊन गेले. त्यांच्या चाहत्यांनी खूप विनवणी केली. म्हणाले, 'आमचे सर तर देशभक्त आहेत. काहीतरी गडबड नक्कीच झाली आहे.' परंतु पोलिस ऐकायला तयार नव्हते. सभागृहात गोंधळ वाढतच चालला होता. भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष सुधांशू मिश्रा पोलिस

अधिकाऱ्यांना समजून सांगण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. पण अप्पासाहेब ऐकून घ्यायला तयारच नव्हते. ते जास्तीच अद्वातद्वा बोलत होते. परिस्थिती हाताबाहेर जात आहे म्हटल्यावर मिश्रांनी पोलिस अधिकाऱ्याला बाजूला बोलावून घेतले आणि विनंतीच्या स्वरात म्हणाले, 'हे बघा ते एक सज्जन गृहस्थ आहेत, शास्त्रज्ञ तसे कधी कधी एककल्ली होतात. मी जबाबदारी घेतो. त्यांना आपण इथून सोडा.'

'ठीक आहे, आम्ही त्यांच्यावर लक्ष ठेवून आहोत. परत जर राष्ट्रद्रोही भाषणं दिली तर त्यांना अटक करावी लागेल. जामीनाची कार्यवाही पूर्ण करा आणि घेऊन जा त्यांना.'

मिश्रा हे या घटनेने अस्वस्थ झाले होते. स्वदेशी चळवळीचे पुरस्कर्ते अप्पासाहेब असेकसे वागू शकतात? आप्पासाहेबांना घरी आणले. घरी अभ्यासिकेत मिश्रा यांनी इतर विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा केली. विषयांतर केले आणि कशीबशी गाडी रुळावर आणून स्वगृही गेले.

'इतिहासाचे थोर अभ्यासक डॉ. आप्पासाहेब अपस्तंभ यांना राष्ट्रद्रोही वक्तव्य केल्याबद्दल अटक आणि जामीनावर सुटका'. बातमी अस्वस्थ करणारी होती. राजकीय पक्ष्यांच्या निदर्शनांमुळे घरची मंडळी, आप्तस्वकीय सगळेच त्रस्त होते. विशेष म्हणजे शास्त्रज्ञांच्या एका पथकाने थेट राष्ट्रपतींचीच भेट घेऊन निषेध नोंदवला. विविध शस्त्रशाखांतील भारतीय संशोधनाचे पुरावेच सादर केले.

अप्पासाहेबांच्या अर्धांगिनी सुद्धा राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या होत्या. त्या तर आप्पासाहेबांचे हे आगळेवेगळे रूप बघून स्तिमित झाल्या होत्या.

'अहो, मी काय म्हणते, तुम्हाला झालंय तरी काय ? सुधांशू होता म्हणून वाचलात.'

'आता तू सुद्धा मला शहाणपणा शिकवणार आहेस का ? पारतंत्र्यात स्त्री शिक्षण होतं तरी कुठे ? सावित्रीबाई फुले यांच्यावर चिखलफेक करण्यापर्यन्त तुम्हा स्त्री जातीने स्त्री शिक्षणाचा दुस्वास केला आहे. तो मॅकॉले भारतात आला, त्याने शिक्षण पद्धती बदलली, त्यात आधुनिकता आणली म्हणून आज हे दिवस आपल्याला बघायला मिळताहेत !'

'झालं का पुन्हा तुमचं सुरू!'

'मला हे पुन्हा लिहून काढायलाच हवं. आणि मला यासाठी एकांत हवा आहे.'

'ठीक आहे, तुम्ही म्हणाल तसं.'

घटना घडून आता आठवडा होऊन गेला होता. सुधांशू आप्पासाहेबांना भेटायला म्हणून घरी जातात तो काय घराला कुलूप ! आप्पासाहेब आणि अर्चना ताई नेमक्या गेल्या कुठे असतील बुवा ? चौकशी केल्यावर मोठ्या प्रयासाने समजलं की, ते त्यांच्या फार्म हाऊस वरती एकांत मिळावा म्हणून अज्ञातवासात वास्तव्य करायला गेलेले आहेत.

'ये, सुधांशू, शेवटी तू माझा पत्ता शोधून काढलासच ना !'

संगणक, इंटरनेट, पुस्तकांचे मोठे ग्रंथालय, इतिहास, विज्ञान, अर्थशास्त्र या विषयाच्या संशोधन – पत्रिका इतस्ततः विखुरलेल्या होत्या. हे बघून मी म्हणालो 'सर ! हे कुठलं कार्यालय थाटलं आहे आपण आता इथे !'

'भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाची पुनर्मांडणी करतोय. संशोधन पत्रिका धुंडाळतो आहे. काय रे ..... या क्रांतिकारकांनी शेवटी मातेरंच केलंना या देशाचं !'

'काय, झालं तरी काय असं, सर?'

'आमचे शास्त्रज्ञ म्हणे क्रांतिकारक होते ! बघ ना

---

नशीब रुसलं तर किती रुसेल ? आणि हसलं तर किती हसेल ? याचा नेम नाही !

त्या जगदीशचंद्र बोस यांनी आपलं वायरलेस लहरींचं संशोधन देऊन टाकलं मार्कोनीला फुकट आणि गमावलं नोबेल. तळपदे नावच्या ग्रहस्थाने म्हणे पहिलं विमान उडवलं. मग सगळं श्रेय राइट बंधूंना का ? सत्येन्द्रनाथ बोस मोठे आइनस्टाईनशी जर्मनीला जाऊन गप्पा मारून आले; पण साधी पीएच.डी. डिग्री मिळवता आली नाही त्यांना. महात्मा गांधी काय लालबहादूर शास्त्री काय यांची हत्या झाल्यावर साधं पोस्टमॉर्टम सुद्धा केलं नाही ? जालियनवाला बाग नंतर डायरचं काय केलं ? मला या सगळ्या गोष्टींची पुनर्मांडणी करायलाच हवी.'

'आप्पासाहेब हे तुमचं क्षेत्र नव्हे. कशाला करता आहात हा उपद्व्याप?'

'मग मी इतिहासकार झालो तरी कशाला ? आणि हे घडलं भारतीयांच्या बाबतीतच ना ?'

आप्पासाहेब काहीच ऐकून घ्यायच्या मन:स्थितीत नव्हते. कुठल्या नकारात्मकतेने त्यांना घेरलं होतं कोण जाणे !

'आप्पासाहेब तुम्हाला तर या वयात दिसण्याचा त्रास सुरू झाला होता. तुम्ही जास्ती वेळ वाचू सुद्धा शकत नव्हता. तुमचं डोकं खूप दुखत असे आणि सध्या १२-१२ तास कॉम्प्युटर स्क्रीनच्या समोर बसून तुम्ही एवढी माहिती ब्राउझ करून सुद्धा तुम्हाला थकवा येत नाहीये. क्रांतीच म्हणायची की !'

आप्पासाहेब आता मात्र जरा सावरले. आपल्या नाकावर खाली सरकलेल्या चष्म्यातून डोळे बारीक करून टोकदार नजरेने सुधांशूकडे बघून म्हणाले. 'आयुष्यभर आनंदासाठी काम केलं, आता कामातून आनंद मिळवतो आहे, मग थकवा कसला जाणवतोय!'

'पण ही तुमची डोकेदुखी नेमकी थांबली कशी?'

'हा चष्मा'.

'चष्मा ! बघूबरं जरा. अरे व्वा, सोन्याचा दिसतोय, चांगलाच जड आहे, डोक्याला मागे घट्ट बसावा म्हणून दोन विशेष बटन्स देखील आहेत. चांगलाच महाग असेल नाही?'

'महाग असेनाका, डोकं दुखणं थांबलं, दुप्पट वेगाने कामाला लागलो, मन कसं तृप्त झालंय.'

सुधांशू चांगलेच अंतर्मुख झाले होते. या नकारात्मकतेपासून सरांना कुठेतरी त्यांच्याच भल्यासाठी थांबवायला हवं होतं.

'सर, आपल्या कार्याला शुभेच्छा देतो.'

'अरे असाच मधून मधून भेटत जा. माझं संशोधन नाहीतरी तुझ्याशिवाय कोण ऐकून घेणार आहे !'

'नमस्कार येतो.'

'मी सुधांशू बोलतोय, डॉक्टर आहेत का? मला त्यांची ॲपॉइंटमेंट हवी आहे.'

'आपण दुपारी ३ वाजता येऊ शकता.' रिसेप्शनिस्ट उत्तरली.

'नमस्कार डॉक्टर, मी सुधांशू मिश्रा. थोर इतिहास तज्ज्ञ आप्पासाहेब अपस्तंभ यांच्या आजाराबद्दल बोलायचंय जरा.'

या, सुधांशू, बसा. ओके, ओके, ते परवाचं प्रकरण. पण आपण कोण आहात ?'

'मी त्यांचा विद्यार्थी तर आहेच, पण अखिल भारतीय इतिहास परिषदेचा अध्यक्ष सुद्धा आहे. राष्ट्रप्रेमी विचारसरणीचे आमचे सर भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाबद्दल इतके नकारात्मक अचानक कसे बोलायला लागले आहेत हेच समजत नाही ! ते असेच जर वागत

राहिले तर त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा खटला उभा राहू शकतो.'

'तुमची काळजी रास्त आहे. हा मानवी भावनांच्या आदलाबादलीचा प्रकार आहे. आपल्या मेंदूतली लिंबिक सिस्टिम या भावनांचे नियंत्रण करत असते. न्यूरोट्रान्स्मिटर पेप्टाइड्समुळे आपल्या भावभावना उत्साहवर्धक किंवा निराशाजनक, सकारात्मक किंवा नकारात्मक, अशा पद्धतीने व्यक्त होत असतात. ही झाली अगदी प्राथमिक माहिती. पण 'लॅन्सेट' नावच्या नावाजलेल्या जर्नल मध्ये मी नुकताच या संबंधीचा एक रिपोर्ट वाचला आहे. हे संशोधन झालं आहे कॅलिफोर्नियाच्या साल्क संस्थेत. पण या प्रकल्पात भारताचे डॉ. गणपती यांचं महत्त्वाचं योगदान असल्याचं कळतं. अहमदाबादच्या सेंटर फॉर सेल्यूलर अँड न्यूरल बायॉलॉजी ईथे ते न्यूरो सर्जन म्हणून कार्यरत आहेत. मी तुम्हाला त्यांचा नंबर देतो. आपण त्यांना जाऊन जरूर भेटा.'

'आभारी आहे डॉक्टर.'

सहा महिन्यांच्या कालावधीनंतर सुधांशू यांना डॉक्टर गणपती यांची ॲपॉइंटमेंट मिळाली.

'या, सुधांशू बसा, आपण मला फोनवर सगळा इतिवृत्तान्त सांगितलेला आहेच. हे बघा मानवी मेंदूत पेशींचे वेगवेगळे दोन समूह असतात. एका गोष्टीशी चांगल्या किंवा सकारात्मक भावना जोडलेल्या असतात तेव्हा वेगळा समूह सक्रिय बनतो आणि वाईट किंवा नकारात्मक भावना जोडलेल्या असतांना वेगळा समूह. रेल्वेचे दोन मार्ग ज्या जंग्शन मधून वेगळे होतात तेथे सिग्नल ज्या पद्धतीने मार्ग नियंत्रित करतो तसेच काहीसे हे असते. मेंदूचा एकच रेणू आपल्याला वाईट आठवणींच्या छायेतून बाहेर पडूच देत नाही. आणि मग त्यातून येते ते नैराश्य किंवा नकारात्मकता. या मुळे एखादा देवभोळा आणि अंधविश्वासू माणूस अत्यंत बुद्धिप्रामाण्यवादी असल्यासारखा वागू शकेल. आता हेच बघा ना. जसे तुम्ही प्रथमच जेव्हा कार्ले खाता तेव्हा त्याची चव तुम्हाला चांगली लागत नाही. मग आज कार्ल्याची भाजी करणार आहे म्हटल्यावर खाण्यापूर्वीच तुम्हाला त्याची चव नकोशी होते. इथे होतं काय की तुमचा मेंदू कार्ल्याच्या सोबत तुमच्या वाईट भावना जोडतो. याला शास्त्रीय भाषेत 'वॅलेन्स असाईनमेंट'असे म्हणतात. आमच्या संशोधनात असं सिद्ध झाले आहे की, चांगली किंवा वाईट आठवण असलेल्या शरीराच्या जैविक प्रक्रियेचा 'स्विच' आम्हाला सापडलेला आहे. त्यामुळे आपण चांगल्या किंवा वाईट, सकारात्मक किंवा नकारात्मक भावना सांगणारे 'स्विच' आपल्या मर्जीनुसार बदलू शकतो. या साठी आम्ही तंत्रज्ञान सुद्धा विकसित करत आहोत. याला ब्रेन-कॉमप्यूटर इंटरफेस आणि कॉमप्यूटर-ब्रेन इंटरफेस तंत्रज्ञान म्हणतात.'

डॉक्टर, थांबा. काय म्हणालात 'सकारात्मक किंवा नकारात्मक भावना सांगणारे 'स्विच' आपल्या मर्जी नुसार बदलू शकतो.' 'डॉक्टर इथेच तर गोम आहे.'

'म्हणजे, मी नाही समजलो.'

'डॉक्टर, आप्पासाहेबांच्या चष्म्यात तर हे गुपित दडलं नसेल. एक विशिष्ट सोन्याचा चष्मा त्यांना एका कंपनीने फुकट दिलेला आहे. त्यामुळे त्यांचे डोके दुखणे बरे झाले असल्याचे ते सांगतात.'

'शक्यता आहे. पण हे जर ब्रेन वॉश करण्याचं षडयंत्र असेल तर यासाठी गुप्तता पळून गुप्तचर विभागाला विश्वासात घेऊन पुढचे स्टिंग ऑपरेशन करावं लागेल.'

'डॉक्टर, या प्रकरणात आम्हाला सहकार्य कराल ना ! आप्पासाहेबांसारख्या विद्वान माणसाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे.'

'हा तर या तंत्रज्ञानाचा गैरवापर झाला! तो मी कसा होऊ देईन बरं ? आता मी सांगतो तसं करा. तो चष्मा आप्पासाहेबांनी कोठून मिळवला ते त्यांच्याकडून नकळत काढून घ्या. भरपूर किम्मत मोजावी लागली तरी चालेल, पण तो चष्मा मिळवा. गुप्तचर विभागाकडे तक्रार नोंदवून हे स्टिंग ऑपरेशन सुरू करा. या प्रकरणाची तांत्रिक विश्लेषणाची सर्व जबाबदारी मी सांभाळीन.'

'नमस्कार सर, कसे आहात, काय म्हणतं आहे काम?'

'अरे, सुधांशू, इकडे कसं येणं केलंस? काही विशेष?'

'सर, मलाही सध्या वाचतांना त्रास होणं, डोकं दुखणं असा त्रास व्हायला लागला आहे. म्हटलं तुमच्या सारखा चष्मा मिळाला तर बरं वाटेल.'

'घे घे, अरे हा माझा घालून बघ ना. कसं वाटतं ते तरी कळेल.'

'नको सर, मला फक्त सांगा, कुठे मिळतो ते. मी विकत घेऊन टाकेन.'

'सफदरजंग भागात इंद्रायणी कॉम्प्लेक्स मध्ये १२ व्या मजल्यावर अतिशय भव्य दुकान आहे. ईश्वरलाल. या त्याच्या मालकाला भेट आणि माझं नाव सांग. आणि मला दिला तसा फुकट दे म्हणाव.'

'बरं, सर येतो.'

'ईश्वरलाल सेठ आहेत का ? मी सुधांशू मिश्रा.

'बोला, चष्मा बनवायचा आहे का ?'

'हो ... , नाही .... पण, म्हणजे ईश्वरलाल सेठ यांनाच भेटायचं आहे.'

'या समोरच्या केबिन मध्ये बसले आहेत ते. भेटा त्यांना.'

नमस्कार चमत्कार झाले आणि म्हणालो 'मी अपस्तंभ साहेबांकडून आलो आहे. मी सुद्धा एक इतिहासकार आहे. मला त्यांच्या सारखाच चष्मा बनवून पाहिजे आहे.'

असे म्हणताच तो चमकला. मला त्याने बारकाईने न्याहाळलं. आणि म्हणाला, 'त्यांच्या सारखाच हवा आहे का ?'

बाहेर जाऊन त्याने एका व्यक्तीला फोन लावला आणि अस्खलित उर्दूत तो त्याच्याशी काहीतरी बोलू लागला आणि परत येऊन म्हणाला –

'मिळून जाईल साहेब आणि अपस्तंभ साहेबांकडून आले आहेत म्हटल्यावर कंपनीने तो चष्मा फुकटच द्यायचे ठरवलेले आहे.पत्ता देऊन जा, सात दिवसांत घरपोच पाठवून देऊ.'

सगळ्याच हालचाली संशयास्पद वाटत होत्या. चष्मा मिळाला की, 'गुप्त हेर' विभागाचे इन्स्पेक्टर सूर्यवंशी यांना भेटण्याचे आम्ही निश्चित केले होते. सातव्या दिवशी सुबक अशा लहानशा लाकडी पेटीत तो सुंदरसा चष्मा मला प्राप्त झाला. हुबेहूब तसाच !

'इन्स्पेक्टर सूर्यवंशी साहेब, चष्मा मिळालेला आहे. डॉक्टर गणपती साहेबांची परवा भेटण्याची वेळ घेतली आहे. आपल्याला दिल्लीहून विमानाने अहमदाबादला निघायचं आहे. डॉक्टर गणपती साहेबांच्या केबिनमधेच आपली गुप्त बैठक निश्चित केली आहे.'

'ओ के, डन.'

रात्रीचे १० वाजले होते.

'डॉक्टर साहेब आत येऊ का ?'

'यस कम इन, या बसा. काही त्रास नाही ना झाला. मी सेक्युरिटीला तसं सांगून ठेवलं होतं. वेळ जरा ऑड आहे ना! बोला.'

डबी उघडून सुधांशू यांनी डॉक्टर साहेबांना चष्मा दाखवला. सोन्याचा तो चष्मा त्यांनी हातात घेतला, त्याचं वजन अजमावलं, त्याला चारही बाजूंनी फिरवून बघितलं, कड्यांवर बोटं फिरवून बघितली, आणि कड्यांच्या मागच्या टोकांवर असलेल्या बटणासारख्या दिसणाऱ्या संवेदकांवर त्यांची बोटे स्थिरावली. त्यांनी तो चष्मा परिधान करून बघितला. डोक्याच्या मागील भागावर कानामागच्या दोन उंचवट्यांवर ती बटणे स्थिरावली होती.

'ओह, स्मार्ट कंपनी.' असे काहीसे डॉक्टर पुटपुटले आणि त्यांनी मोबाईलवर कोण्या एका स्त्रीला केबिनमध्ये बोलावून घेतलं.

'डॉक्टर, ही गुप्त सभा आहे. इथे चौथा कोणी कशाला पाहिजे !'

'घाबरू नका, डॉ. मोना या कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयातल्या तज्ज्ञ शास्त्रज्ञ आहेत. त्या आपल्या या टीमचा एक भाग असणार आहेत. आणि त्याच या सिस्टीमचा छडा लावणार आहेत.'

'मे आय कमइन सर ?'

'या मोना मॅडम, जॉइन अस. हे सुधांशू आणि हे इन्स्पेक्टर सूर्यवंशी. असं म्हणत डॉक्टरांनी तो चष्मा मोना मॅडमच्या हातात दिला. त्यांनीही तो बारकाईने न्याहाळला आणि म्हणाल्या -

'यस, मला सांगा, अपस्तंभ साहेब हा चष्मा घालून संगणकाच्या पडद्यासमोरच बसून काम करतात का?'

'बरोबर बोललात मॅडम. अहो पूर्वी पुस्तकं वाचणारा हा माणूस एकाएकी संगणकवेडा झाला कसा, आणि तेही वयाच्या सत्तरीत ?'

'ही ब्रेन-कॉम्प्युटर इंटरफेस तंत्रज्ञानाची कमाल आहे. पूर्वी केसाच्या धाग्याइतकी बारीक चीफ त्या व्यक्तीच्या मेंदूत रोपित करावी लागत असे. परंतु सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने इंटरफेस तंत्राचा वापर करून चांगल्या किंवा वाईट भावना सांगणारे 'ब्रेन स्विच' आपल्या मर्जी नुसार आपण बदलू शकतो. ठीक आहे, मी याची बारकाईने तपासणी करते आणि मग आपण इतिहास तज्ज्ञ अप्पासाहेब अपस्तंभ यांच्या घरीच त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊ या.'

'मॅडम, हा चष्मा फार मोठ्या आंतरराष्ट्रीय षड्यंत्रापर्यंत आपल्याला नेऊन पोहोचवू शकतो. हा चष्मा मी आपल्याकडे सुपूर्द करतो'.

'अरे, ये ये, सुधांशू बैस. मिळाला का तुला चष्मा ?' थोडीशी मान वर करून बघतात तो काय, त्यांना आणखीन चार जण खोलीत शिरताना दिसले.

'सुधांशू, अरे ही कोण मित्रमंडळी बरोबर घेऊन आला आहेस ?'

'हे डॉक्टर गणपती, हे इन्स्पेक्टर सूर्यवंशी आणि या शास्त्रज्ञ डॉ. मोना'.

'बसा, बसा. आज एवढं मोठं कसलं काम काढलं माझ्या सारख्या निवृत्त इतिहासकाराकडे ?'

'सर, सरळच विषयाला हात घालतो. हा तुमचा चष्मा म्हणजे एका षड्यंत्राचा भाग आहे. तुमच्या भावनांवर तांत्रिकदृष्ट्या नियंत्रण प्राप्त केलं गेलं आहे. तुमच्या चष्म्यातला कृत्रिम बुद्धिमत्तेचा आविष्कार डॉ. मोना मॅडम यांनी शोधून काढला आहे.'

---

नियमितपणा हा दुसऱ्याच्या वेळेला किंमत देण्यातून जन्माला येतो.

'हे बघा, हे तंत्रज्ञान आहे वगैरे सगळं ठीक आहे, पण माझा माझ्या बुद्धीवर पूर्ण विश्वास आहे. मी विचार करू शकतो, माझा काही बुद्धिभ्रम झालेला नाहीये.' असे म्हणून अप्पासाहेब आम्ही काय म्हणतो होत या कडे लक्ष द्यायला तयारच नव्हते.

'हे बघा अप्पासाहेब, तुम्हाला दिलेला हा चष्मा म्हणजे तंत्रज्ञानाचा अतिप्रगत आविष्कार आहे. तुमच्या मेंदू मध्ये कुठलीही चीप रोपित न करता 'बिना रोपण' 'नॉन इन्वेसिव' तंत्रज्ञानाने कार्य करणारे हे एक छुपे अस्त्र आहे. बाहेरून आकर्षक दिसणाऱ्या या चष्म्याच्या कड्यांमधून आवश्यक ती यंत्रणा बसवलेली आहे. तुम्ही जेव्हा डोळ्यावर चष्मा लावता, तेव्हा त्याच्या कड्यांचा तुमच्या मस्तिष्काच्या आत मागील बाजूला असलेल्या 'व्हिज्युअल कॉर्टेक्स'शी त्याचा संपर्क होतो, आणि तेथूनच तुमच्या मेंदूवर नियंत्रणाची सुरुवात होते. तुमची प्रत्येक शारीरिक हालचाल, विचार, मेंदूतून उमटणारे तरंग यांची नोंद घेतली जाते. प्रत्येक नोंदीचा अभ्यास करून त्याचे आकृतीबंध बनवले जातात. या आकृती बंधांचा अभ्यास करून संगणकाद्वारे योग्य वेळी त्या मेंदूतल्या योग्य न्यूरॉन्सना सूचना दिल्या जातात. म्हणजे चक्क नवे विचार तुमच्या मेंदूत पेरले जातात. आणि मग तुम्ही त्यानुसार बोलू लागता. यालाच 'ब्रेन स्विच' असं म्हणतात. आप्पासाहेब तुमच्या बाबतीत असंच काहीसं झालेलं दिसतंय.' डॉ.मोना सांगत होत्या.

आता सूत्र इन्स्पेक्टर सूर्यवंशी यांनी आपल्या हातात घेतली आणि म्हणाले 'आम्हाला तुमच्या चष्म्याच्या कड्यांमध्ये अशाच प्रकारची यंत्रणा सापडली आहे. आठ महिन्यांपूर्वी तुम्ही संशोधनाला सुरुवात केली होती आणि चष्मा सुद्धा तुम्हाला आठ महिन्यांपूर्वीच मिळाला होता. हा काही केवळ योगायोग नाहीये. तुम्ही चष्मा घातल्यावर तुमच्या नकळत त्या परदेशी कंपनीने आपल्या देशाबद्दल नकारात्मक विचार पेरले असावेत आणि ते सूत्र पकडून तुमच्या संशोधनाला सुरुवात झाली असावी. तुम्ही इंटरनेट आणि सोशल मीडिया वर तेच शोधत राहिलात. सर्च एंजिनच्या विशिष्ट कार्य सूची मुळे अल्गोरिदम त्याला अधिक बळ मिळालं. तुम्ही त्या वादग्रस्त बाजूचा पुनःपुन्हा अभ्यास करत सुटलात. आपल्या देशाची सकारात्मक बाजू आपल्या समोर कधी येणारच नाही याचीही खबरदारी घेण्यात आली होती. एक देशाचा विषय सोडला तर इतर कुठलेही वावगे विचार तुमच्या मनात पेरले गेले नसावेत. त्यामुळे देशाविषयीचा विचार वगळता तुमची वर्तणूक सामान्य आहे. म्हणून तसे विशेष असे कोणाच्या लक्षात सुद्धा आले नाही.'

'सर, मी तुम्हाला जे ओळखतो, ते असे की, आपल्याच देशाच्या विरोधात बंड करून उभे राहण्याचा तुमचा स्वभाव नाही. तुमच्या मनातली तळमळ तुम्ही नेहमीच बोलून दाखवत असता. म्हणजे तुम्ही परिघावर कुठेतरी आहात हे या परदेशी कंपनीने जाणले. आणि याचा फायदा या कथित यंत्रणेने घेतला.' सुधांशू बोलत होते.

डॉक्टर गणपती आता बोलू लागले. 'या निमित्त आपल्या सारख्या महान इतिहासकारची ओळख झाली हे मी माझं भाग्य समजतो. नाहीतर आम्ही २४ तास मेंदूची शल्यकर्म करणारी यंत्रे आहोत. जरा लहान तोंडी मोठा घास घेतो पण जीवनाचं हे तत्त्वज्ञान नक्की अंगिकारा. 'या जगात कोणालाही फुकट जेवण मिळत नाही. एखाद्या वस्तुसाठी जर आपण पैसे मोजत नसाल तर नक्की समजा की, आपणच एखाद्याच्या हातातली वस्तू झालो आहोत'

'हं, .... बरोबर आहे तुम्ही म्हणता ते.' एक दीर्घ श्वास टाकून आप्पासाहेब म्हणाले, 'गेल्या सहा

(पृष्ठ क्र. २४ वर)

# अद्भुत लोणार सरोवर आणि काठावरची चमत्कारिक मंदिरे!

*लोणार येथील सरोवराचा नैसर्गिक, ऐतिहासिक, पुरातत्त्वीय, पौराणिक आणि वैज्ञानिक सत्यासत्यतेच्या दृष्टीकोनातून घेतलेला आढावा या लेखात आलेला आहे. - संपादक*

लोणार हे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील लहानसे नगर. आशियातील पहिल्या आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाचे खारट पाण्याचे बसाल्ट खडकातील सरोवरामुळे ते आज जगात ओळखले जाते. आजमितीला ते भारताचे भूशास्त्रीय सांस्कृतिक स्मारक म्हणून मान्यता पावले आहे. हे सरोवर उल्कापातातून तयार झाले. ते ४९० फुट खोल असून त्याचा व्यास १.२ कि.मी. इतका आहे. या विवराच्या कडेचा व्यास १.८ कि. मी. इतका आहे. येथील पाण्याचा सामु (पी. एच.) १०.५ इतका असतो. असे वैशिष्ट्यपूर्ण जागतिक वारसा स्थळ म्हणून लोणार नावाजलेले असले तरी या परिसराला पौराणिक महात्म्य, तसेच वैज्ञानिक व अभिकल्पीय दृष्टीकोनातून साकारलेली अप्रतिम पुरातन स्थापत्यांची सुवर्णकिनारसुद्धा लाभलेली आहे. आपण नेहमीच बघतो की, पुरातन स्थानाबाबत अनेक आख्यायिका व त्या अनुषंगाने अनेक वाद-प्रतिवाद जुळलेले असतात. असेच काहीसे लोणारबाबत दिसून येते. या सर्वांचा विचार केला तर एक वेगळीच अनुभूती मनात तयार होते. उदाहरणार्थ, हे सरोवर केव्हा तयार झाले, त्या बाबत असलेली मतभिन्नता इत्यादी.



लोणार सरोवर

वैज्ञानिक मतानुसार ५,७६००० ते ४,७०,०० वर्षे इतका प्रदीर्घ काळ या उत्पत्ती बाबत असू शकतो. थर्मोलुमिनीसन्स पद्धतीने या विवराची उत्पत्ती ५६,००० वर्षे आधी, तर कार्बन डेटींग पद्धतीने ही उत्पत्ती ५,७६,००० वर्षां आधीची असल्याचे सुचविते. तसेच हे सरोवर ज्वालामुखीमुळे की उल्कापाताने तयार झाले, या विषयी सुद्धा संभ्रम आत्तापर्यंत होता. ब्रिटिश लष्करी अधिकारी सर जी. अलेक्झांडर याने १८२३ साली इथे भेट दिली असता, हे सरोवर ज्वालामुखीमुळे तयार झाल्याचा अभिप्राय नोंदविला. मात्र, १९६९ साली अपोलो यानाने चंद्रावर जाऊन आणलेल्या तेथील मातीचे आणि लोणारच्या मातीचे गुणधर्म जवळपास मिळते-जुळते दिसल्यावर १९७५ साली लोणारचे विवर उल्कापाताने तयार झाल्याचे स्पष्ट झाले. ही उल्का सुमारे वीस हजार कोटी टन वजनाची होती व ती २० कि.मी. प्रती सेकंद या वेगाने पृथ्वीच्या वातावरणात शिरली. ओझोनच्या प्रभाव क्षेत्रात प्रवेश घेताच तिने पेट घेतला आणि प्रवास चाळीस कि.मी. प्रती सेकंद असा वेगाने वाढून सरतेशेवटी या ठिकाणी आदळली. त्यावेळेस पृथ्वी कंपायमान झाली. हा स्फोट हिरोशिमावर झालेल्या स्फोटापेक्षा कितीतरी पटीने मोठा होता. काय वाटले असेल तेंव्हा पृथ्वीला? ही अजस्र उल्का भयानक ज्वालेसह आपल्याकडे येतांना बघून ती भयभीत झाली असेल. तिची ती अवस्था पाहून अश्नी

म्हणाली असेल ''भिऊ नकोस माते. मी तुझीच मुलगी आहे. मला तुझ्या उदरात परत विसावा घ्यायचा आहे. जसा मला त्रास होतो आहे, तसाच तुलाही होईल. पण, त्यातून नक्की चांगलंच घडणार आहे. प्रत्यक्ष विधाता त्या स्थळी येईल आणि तुझ्या - माझ्या संयोगस्थळाला बघून तृप्त होईल. याच ठिकाणी पुढे 'संजीवनी विद्या' सिद्ध होईल.'' अश्नीची ही वाचा ऐकून पृथ्वी कृतार्थ झाली असेल आणि म्हटले असेल, ''ये पोरी..! आता माझे भय संपले आहे. भविष्यातील त्या सुखद घटनेसाठी मी थोडं दु:ख सहन करण्यास तयार आहे.'' तप्त अश्नी पृथ्वीच्या पोटात विसावल्यानंतर त्या दोघीही कितीतरी दिवस जळत होत्या. कालांतराने निसर्गास ही अवस्था बघवता न आल्याने, त्याने धुवाधार पर्जन्य करून त्यांना शांत केले. त्यातूनच सध्याचे सरोवर आणि वन तयार होऊन, पुढे प्रभू राम हे, भ्राता लक्ष्मण आणि सितामातेसह इथे भेट देते झाले. मुनी शुक्राचार्यांनी इथेच 'संजीवनी विद्या' सिद्ध केली.

२०२० साली झालेल्या एका अद्भुत घटनेने लोणारचे सरोवर परत चर्चेत आले. २५ मे २०२० रोजी 'नासा' ने उपग्रहाद्वारे घेतलेल्या चित्रात हिरवे दिसणारे सरोवराचे पाणी १० जून २०२० रोजी घेतलेल्या चित्रात गुलाबी झाल्याचे आढळून आले. तो करोनाकाळ होता. त्यामुळे काहीतरी अघटित घडणार अशी शंकेची पाल जनमानसात चुकचुकली. शेवटी स्पष्टीकरण देण्यासाठी वैज्ञानिकांना पुढे यावे लागले. नागपूरच्या 'निरी' आणि पुण्याच्या 'आधारकर संशोधन संस्था' यांनी केलेल्या संशोधनातून हा रंग त्या पाण्यात वाढणाऱ्या लवणजलरागी (हेलोआर्क बॅक्टेरिया) या जिवाणूंच्या असण्यामुळे प्राप्त झाला, या निष्कर्षाप्रत ते आलेत. हेलोआर्क बॅक्टेरिया हे क्षारयुक्त पाण्यात वाढणारे जिवाणू गुलाबी रंग तयार करतात आणि त्याचा या पाण्याच्या पृष्ठभागावर थर तयार होतो. हा गुलाबी रंग कायमस्वरूपी टिकत नाही. कालांतराने तो सरोवराच्या तळाशी बसतो आणि पाणी परत हिरवे दिसू लागते. याबाबत अधिक स्पष्टीकरण देताना नासा म्हणते, - 'दुनालिएला सॅलीना (Dunaliala Salina) ही एकपेशीय शैवाल सामान्य परिस्थितीत हिरव्या रंगाची असते. परंतु जेव्हा पाण्यातील क्षार संपृक्त बनतात किंवा पाणी जेव्हा सूर्यप्रकाशात उघडे राहते, तेव्हा हे शैवाल कॅराटेनॉइड हे गुलाबी रंगाचे संरक्षक रसायन तयार करते. उन्हाळ्यात तापमान वाढल्यामुळे, बाष्पीभवन झाल्याने व अपुऱ्या पावसामुळे पाण्याची पातळी कमी झाली की क्षारांचे प्रमाण वाढते व त्यामुळे बिटा - कॅरॉटिनॉइड तयार होऊन सरोवर लाल - गुलाबी रंगाचे दिसू लागले.'

आता लोणार हे नांव कसे पडले याकडे वळू. पौराणिक ते सध्याच्या काळापर्यंत या गावाने विविध नावे धारण केल्याचे दिसून येते. उदा. पद्मपुराणात लोणारला 'मधुमती' अशी ओळख होती. सध्याचे लोणार हे नांव 'लवणासूर' या राक्षसराजावरून पडले अशी आख्यायिका आहे. त्यानुसार लवणासूर हा राक्षस, त्याच्या भाऊ आणि दोन बहिणींसोबत या क्षेत्रात वास्तव्यास होता. तो येथील प्रजेवर अनन्वित छळ करायचा. त्याच्या छळास कंटाळून प्रजेने भगवान विष्णूकडे त्याचा क्षय करून होणाऱ्या जाचातून मुक्त करण्याची प्रार्थना केली. तेव्हा स्वतः भगवान विष्णू बटू स्वरूपात, ब्रह्मदेवासह इथे आले आणि संपूर्ण राक्षस कुटुंबास यमसदनी धाडून प्रजेची लवणासूराच्या जाचातून सुटका केली. लवण म्हणजे क्षार आणि राक्षस म्हणजे असूर. अशाप्रकारे लवणासूर राक्षसावरून लोणार हे नाव पडले असावे. या आख्यायिके व्यतिरिक्त आणखी एक समज असा आहे की, येथील सरोवराच्या पाण्यात क्षारांचे प्रमाण जास्त असल्याने ते इतके खारट झाले आहे की, त्यापासून मीठ म्हणजेच लवण तयार करण्याचा व्यवसाय या परिसरात भरभराटीस आला होता. या

उद्योगाची दखल अकबराच्या 'आई-ने-अकबरीत' आढळून येते. हे लवण शक्तीवर्धक आणि औषधीयुक्त असल्याने त्याची ख्याती देश-विदेशांत पसरली होती. तेव्हा, असे लवण तयार करणाऱ्या कारागिरांना 'लवणारे' असे संबोधले जाई. आजघडीस 'लवणारे' आडनांव धारण करणारी मंडळी या भागात वास्तव्यास आहेत. अशाप्रकारे लवणारे या नावावरून 'लोणार' हे नांव या गावास प्राप्त झाले, असाही एक मतप्रवाह आहे. कधीकाळी लोणार सरोवराला 'पंचाहत्तरी' सरोवर म्हणूनही ओळखले जायचे ते त्याच्या विवरात असणाऱ्या पंचाहत्तर झऱ्यांमुळे. सध्या यापैकी गोमुख, रामगया, सितान्हानी, महाबळेश्वर आणि कमळजाईचा झरा असे पाचच झरे जिवंत आहेत.



विष्णू मंदिर

सरोवराच्या प्रवेशद्वारातून सुमारे दीडेकशा पायऱ्या उतरून खाली आलो, की उत्तर दिशेला भव्य विष्णू मंदिर दिसते. या मंदिराच्या सुमारे पंधरा फुट खाली गोमुखातून पाण्याचा मोठा प्रवाह खाली कोसळताना दिसतो. हे पाणी काळ्या दगडात बांधलेल्या बावडीत सातत्याने पडत असल्याने ती नेहमीच स्वच्छ पाण्याने तुडुंब भरलेली असते. इथे तुम्ही आंघोळ करू शकता. कपडे बदलण्यासाठी स्त्री आणि पुरुष यांच्याकरिता वेगळी व्यवस्थासुद्धा या स्थळी आहे. १९७२ सालच्या दुष्काळात या झऱ्याची धार करंगळी इतकी लहान झाली होती, पण ती बंद झालेली नव्हती. २०१३ साली नासाने घेतलेल्या भूगर्भीय फोटोतून हा झरा २२ कि.मी. अंतरावरील पैनगंगा व ४० कि.मी. अंतरावरील पूर्णा या दोन नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात पक्क्या विटांच्या पाटातून व नंतर वरच्या अंगास हे दोन्ही पाट एकत्रित करून, पुढे एकाच पाटाद्वारे इथपर्यंत पाणी आणण्यात आल्याचे स्पष्ट होते. तसेच हे पाणी स्वच्छ राहावे याकरिता गोमुख आणि विष्णुमंदिराच्या तळाचा सुमारे पंधरा फुट उंचीचा भाग लाकूड, कोळसा, लहानमोठे दगड व रेतीच्या थरांनी तयार करण्यात आलेला आहे. थोडक्यात, सध्या रेनवॉटर हॉर्व्हेस्टींगमध्ये विहिरीत पाणी सोडण्याआधी शुद्धीकरणासाठी वापरात असलेली पद्धत आपल्या पूर्वजांना आधीपासून ज्ञात होती हे बघून, विज्ञान विषयात आपण इतरांच्या तुलनेत कितीतरी पुढारलेलो होतो हे स्पष्ट होते. ही भारतीयांसाठी नक्कीच अभिमानास्पद बाब आहे.

विष्णुमंदिराच्या अगदी समोर काही अंतरावर कमळजाईचे म्हणजे लक्ष्मीदेवीचे मंदिर दिसते; पण त्यासाठी मधे आडव्या येणाऱ्या सरोवराला प्रदक्षिणा घालून पलीकडे जावे लागते. हा मार्ग राखीव जंगलातून जातो. या जंगलात अनेकविध पशुपक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी, विविध प्रकारच्या वनस्पतींनी समृद्ध असल्याने शासनाने हे जंगल वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. हे वन मोर, रोहित, हॉर्नबिल, कोतवाल, गोलकंठक, गुटगुट्या, स्वर्गीय नर्तक आदी पक्षी; तर तरस, कोल्हा, लांडगा, बिबट्या असे हिंस्त्र पशू व त्यासोबत विविध सरपटणारे प्राणी, कीटक यांचे माहेरघर आहे. सरोवराचे पाणी पिण्यायोग्य नसल्याने वनविभागातर्फे अनेक ठिकाणी या वन्यजीवांसाठी पाण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

गोमुखातून निघणाऱ्या खळखळ वाहणारा झरा, पक्ष्यांचे कलरव आणि शितल वाऱ्याच्या साथीनं आपण

मार्गक्रमण करीत असता काही अंतरावर २५ फुट लांबीचा लाकडी पूल येतो.

येथून डाव्या बाजूला बघितले तर वरच्या अंगास आणखी एक झरा मंदपणे कोसळताना दिसतो. या झऱ्याचे गोमुखातून निघणाऱ्या झऱ्याशी काहीएक घेणे-देणे नाही. 'लोणार' हा धबधबा. सभोवतालच्या वनराईच्या पार्श्वभूमीवर आपल्याच तंद्रीत मंदपणे कोसळत असतो. त्याचे ते तसे कोसळणे मंत्रमुग्ध करीत असते. पूल ओलांडला की समोरच यादवकालीन हेमाडपंथी कुमारेश्वर मंदिर दिसते. याला बघून इजिप्तच्या पिऱ्यामिड्सची आठवण येते. विविध लांबीचे आयताकार दगड एकावर एक रचून यांची बांधणी केली आहे. हे महादेवाचे मंदिर असून, नेहमी पिंडीसमोर असणारा नंदी इथे भग्नावस्थेत बाहेर विराजमान आहे. बाहेर लख्ख ऊन असले तरी गाभाऱ्यात मात्र काळोख असतो. टॉर्चच्या प्रकाशात शिवाची पिंड कशीबशी दिसते. मात्र, मंदिराचा बाह्य परिसर सूर्यकिरणांच्या मगदूरानुसार क्षणोक्षणी आपले सौंदर्य बदलवत असतो.

सरोवराच्या काठाकाठाने अशाप्रकारची सुमारे पंधरा मंदिरे असून, त्यातील बहुतांश शिवाची आहेत. त्या सर्वांपर्यंत आपण पोहोचू शकत नाही. त्यामुळे यापैकी सहा-सात मंदिरांनाच भेट देणे शक्य होते. बहुतांश मंदिरं सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह याप्रकारातील आहेत. इथे 'सभामंडप' म्हणजे पृथ्वीवरील माणसे, 'गर्भगृह' म्हणजे देवाचे निवासस्थान - 'स्वर्ग आणि अंतराळ' म्हणजे स्वर्ग व पृथ्वी या मधील पोकळी असे अर्थ अभिप्रेत आहेत.

कुमारेश्वर मंदिराच्या अगदी समोर उघड्यावर शंकराची पिंड दिसते. हे स्थान म्हणजे 'सितान्हाणी' अशी आख्यायिका आहे. या स्थळी वनवासात प्रभू राम हे सितामाता व बंधू लक्ष्मणासह आले असता श्रीरामाने पृथ्वीच्या दिशेने बाण मारून पाण्याचे स्रोत्र मातेच्या आंघोळीसाठी उपलब्ध करून दिले. हा झरा अगदी लहान असला तरी तो इतर झऱ्यांचा उपझरा नक्कीच नाही, हे त्याच्या वरच्या बाजूस असलेल्या दगडांच्या एक-दोन थरांनी स्पष्ट होते. इथून पुढे आलो की वनविभागाची चौकी येते.



ऋषीवर शुक्राचार्यांची यज्ञवेदी

आता जंगलातील पायवाटेने प्रवास सुरू असता पुढ्यात येते ते यज्ञमंदिर वा राक्षसगुरू शुक्राचार्यांची तपोभूमी. लोणार सरोवरातील हे महत्त्वाचे स्थान आहे. या मंदिराचे उर्ध्वस्थान मोकळे असून, रात्रीच्या वेळेस ग्रह आणि तारे यांचा खगोलीय अभ्यास व त्यानुसार हवामानाचा अंदाज व ज्योतिषशास्त्राचे आराखडे तयार करण्याचे सखोल ज्ञान गुरू-शिष्य परंपरेतून प्रजाजनांना उपलब्ध करून देण्याचे प्रमुख व्यासपीठ म्हणून या स्थानाने भूमिका निभावलेली आहे. सध्या ही जागा दगडी पाट्या टाकून बंद केलेली आहे. सभामंडपात लागूनच यज्ञवेदी दिसते. अग्नी आणि धूर यांचा त्रास होऊ नये यासाठी चारी बाजूंनी, तसेच ऊर्ध्व दिशेने फक्त खांब सोडून इतर भाग मोकळा सोडला आहे. कधीकाळी गर्भगृहात असलेले शिवलिंग आणि नंदी सध्या उघड्यावर पडलेले आहेत. बाहेरच्या प्रांगणात कोणेएकेकाळी देवळाच्या बांधकामात वापरात असलेल्या शिळा इतस्ततः विखुरलेल्या दिसतात. मात्र, भारतीय पुरातत्त्व खात्याने डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेच्या माध्यमातून

या सर्वांचे सर्वेक्षण करून ठेवले आहे. त्यामुळे भविष्यात हे भव्य मंदिर परत बांधण्यात येऊन त्याचे पुरातन सौंदर्य पर्यटकांना बघण्यास उपलब्ध होईल यात शंका नाही.

आणखी पुढे आलो की दोन वाटा दिसतात. एक रामगया मंदिराकडे आणि दुसरी सरोवराकडे जाते. रामगया मंदिर उंचवट्यावर आहे. गर्भगृहात प्रभू श्रीरामाची मूर्ती उभी असून, या मंदिराच्या अगदी समोर पवनपुत्र हनुमानाचे वेगळे मंदिर आहे. खरे म्हणजे, कधीकाळी या स्थानी श्रीराम, सितामाता आणि लक्ष्मणाच्या मूर्त्या एकत्रितपणे होत्या; पण निजामाच्या काळात त्या भंग करण्यात आल्या. कालांतराने प्रथम लाकडाची व आता असलेली पाषाणातील रामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंदिराचे स्थापत्यविशेष असे आहेत की, रामाच्या मूर्तीसमोर हात जोडून उभे राहलो की मूर्तीच्या दोन्ही बाजूला आपल्यास दोन पडछाया दिसतात. भाविकांत अशी श्रद्धा आहे की, तुमच्या भक्तीस प्रसन्न होऊन सितामाता आणि लक्ष्मण छायांच्या स्वरूपात प्रगट होऊन आशीर्वाद देतात. आस्थेचा भाग वजा केला तरी प्रकाशाचं योग्य दिशेने केलेले परावर्तन, तेव्हाच्या कारागीरांचं कसब अधोरेखित करते.

रामगया मंदिराबाहेर पाण्याने भरलेले कुंड दिसते. हा आहे रामकुंड वा पुष्करतीर्थ! याविषयी अशी आख्यायिका आहे की, प्रभू रामचंद्रांना त्यांचे पिता राजा दशरथाच्या मृत्यूची बातमी समजल्यानंतर त्यांचे श्राद्ध या तिर्थावर केले. परिसरातील रहिवासी या ठिकाणी श्राद्धविधीसाठी इथे येत असतात. आता राजस्थानातील पुष्कर तीर्थक्षेत्र खरे की येथील? हा वादाचा मुद्दा असला तरी त्या फंदात न पडता येथील लोकांच्या भावनेचा आदर आपण करायला हवा. हे तीर्थ उत्खननात नव्याने सापडले आहे. या तिर्थाजवळच श्रीगणेश-शंकर मंदिर आहे. इथे तीन पदरी चौकोनी शिवलिंग असून ते 'रामेश्वर लिंग' म्हणून ओळखले जाते. यज्ञेश्वर आणि रामाच्या मंदिरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, या परिसरात चुंबकीय गुणधर्म असणारे दगड- माती भरपूर प्रमाणात आढळतात.

आता इथून पुढचा प्रवास सरोवराच्या काठाकाठाने सुरू होतो. अधूनमधून ओलसर, चिखलसदृष्य जागेतून पायपीट करावी लागते. त्यामुळे हाती एखादी काठी ठेवणे आवश्यक असते. हळूहळू आपण सरोवराच्या पाणवठ्यावर पोहोचतो. मात्र, हे पाणी दुरूनच न्याहाळणे सोयीस्कर असते. सामुच्या पट्ट्या लावून बघितले असता तो अकराच्या जवळपास दिसतो. साध्यासोप्या भाषेत सांगायचे तर, समुद्राच्या पाण्यापेक्षा या सरोवरातील पाण्यात क्षार दहापटीने जास्त आहेत. पाण्याच्या हिरव्या पार्श्वभूमीवर अधूनमधून पांढऱ्या रंगाचा तवंग आढळतो. हा तवंग स्पोरोलीना नामक शेवाळापासून तयार होतो आणि हे भरपूर प्रथिनयुक्त असल्याने रोहित पक्ष्यांचा तो आहार आहे. त्यामुळे हे पक्षी दूरवरून इथे भेट देत असतात आणि त्यांच्या प्रथिनांची पूर्तता करून घेतात. हा तवंग वाळवून त्यापासून मधुमेहींसाठी उत्तम औषध तयार होते. या पाणथळ जागेशेजारी जंगली कलिंगडाची झाडे आढळतात. विशेष म्हणजे यांची फळे बोराएवढी लहान असून त्यात एकच बी असते. या बीचा आकार शंकराच्या पिंडीसारखा असल्याने भक्तगणांत या झाडाविषयी नेहमी कौतुक असते. सरोवराचे पाणी, तिथे असणारे क्षार, विविध औषधी वनस्पती या सगळ्यांचा उपयोग करून शुक्राचार्यांनी संजीवनी विद्या सिद्ध केलेली असेल याविषयी दुमत होऊ शकत नाही.

आणखी पुढे आलो की वाघ महादेव मंदिर दिसते. मूळात हे शिव मंदिर असले तरी कधीकाळी या स्थानी वाघाचे अस्तित्व असल्याने प्रस्तुत मंदिर 'वाघ मंदिर' म्हणूनच ओळखले जाते. या मंदिरास तीन दिशांना दारे असून, मधल्या दारात उभे राहिलो की लोणार सरोवराचे विहंगम दृश्य नजरेस पडते. पर्यटक इथे आपसूकच काही

काळ थांबून पुढे जातात. वाटेत 'मोर मंदिर' लागते. हे सुद्धा शिवमंदिर आहे. इथे मोरांचेच राज्य आहे. त्यांच्या केकावण्याने आसमंत त्या आवाजाने भरून असतो. हे मंदिर पाण्यातच वसले असल्याने दूरूनच ते बघता येते. यानंतर येते 'कमळजा वा पद्मावती देवीचे मंदिर.' या मंदिराच्या अगदी खालून उल्का पृथ्वीच्या पोटात उदरात सामावली आहे. ही स्वयंभू मूर्ती असल्याचे स्थानिक मानतात. या मूर्तीचे स्वरूप तांदळाच्या दाण्यासारखे असून, हिला बघताच माहूरच्या रेणूकामातेची आठवण येते. ही देवी अनेक कुटुंबांची कुलदेवता असल्याने नवरात्रात या ठिकाणी मोठा उत्सव असतो. या मंदिराच्या अगदी समोर सासू - सुनेची विहीर आहे. सासू - सुनेच्या खारट-गोड नात्याप्रमाणेच या विहिरीचे एका बाजूने पाणी गोड, तर दुसऱ्या बाजूने पाणी खारट आहे.

या मंदिराशिवाय पलीकडे आणखी काही मंदिरे असून ती बहुतांश महादेव मंदिरे आहेत. सरोवराच्या काठाकाठाने अशाप्रकारची बारा शिवमंदिरे आहेत. महादेवाची भारतात असलेली बारा स्थाने ज्योतीर्लिंगे म्हणून ओळखली जातात. सामान्यांना या सगळ्या स्थानी जाऊन दर्शन घेणे दुर्लभच. तेंव्हा दीड हजार वर्षांपूर्वीच्या राज्यकर्त्यांनी त्या बारा ज्योतिर्लिंगांचे प्रतिनिधित्व करणारी बारा शिवलिंगे लोणार सरोवराच्या काठावर बांधून काढली. मुख्य उद्देश होता, प्रजेला ज्योतिर्लिंगांचे दर्शन घडवण्याचा. हा तेंव्हाच्या राज्यकर्त्यांचा प्रजेच्या सोयीचा उदार दृष्टीकोन होय.

थोडक्यात, उल्कापातातून तयार झालेले लोणारचे हे खारट पाण्याचे सरोवर नैसर्गिक असले तरी त्यात सतत गोडे पाणी ओतणारे झरे व त्यांचे अखंडपण शाबूत राखण्यासाठी तेंव्हाच्या राज्यकर्त्यांनी नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात केलेली बांधणी. शुक्राचार्यांची यज्ञभूमी व गुरूकुल, चालुक्य, यादव वा त्यांच्या आधीच्या राजांनी सरोवराच्या काठाकाठाने मंदिरांची बांधलेली श्रृंखला व यास जोड असलेले औषधीयुक्त वनस्पतींचे जंगल हे सगळं कसं अचंबित करणारे आहे. या सगळ्या कामांत गरीब, श्रीमंत, बुद्धीवादी, विज्ञानवादी आणि सोबत कितीतरी जातीधर्मांच्या लोकांचा हातभार लागला असेल. यातून समजून येते की, या उभारणीत आपल्या रक्ताचा संबंध नसला तरी 'रक्त बनवणाऱ्यांचा' संबंध नक्की आहे. या दैवी नात्याने आपण सगळेच एकमेकांचे दैवी-भाऊ आहोत, हा समज मात्र दृढ होतो.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

---

(पृष्ठ क्र.१८ वरून - **तो मी नव्हेच !**)

महिन्यांपासून ते लोक माझ्या मागावर होते. प्रत्येकाचे स्व-विचार याच्या इतकी दुसरी खाजगी मालमत्ता असूच शकत नाही, पण त्यांनी चक्क माझ्या विचारांचीच चोरी केली ! माझा स्थायी स्वभाव आणि मूळ ओळखच मी विसरून गेलो होतो. नाही, मुळीच नाही 'मी तो नव्हेच'.

दारावर सबइन्स्पेक्टरानी काठीने ठक ... ठक... केले. 'सर, ईश्वरलाल सेठ आणि त्यांच्या टोळक्याला अटक झाली आहे. स्टिंग ऑपरेशन इज कंप्लीट.'

अभिनंदन करत इन्स्पेक्टर सूर्यवंशीच्या चेहऱ्यावर हास्य विलसत होतं.

गंभीर वातावरण आता निवळलं होतं. आप्पासाहेब आता मोकळेपणाने हसताना बघून सगळ्यांना हायसं वाटलं आणि सगळेच त्या हास्य-कल्लोळात सामील झाले...

**- डॉ. रंजन गर्ग**

•••

# शिवकाशी : शतायू उग्रमंगल, रौद्ररम्य फटाके उद्योगाची नगरी

*नुकतीच आपण दिवाळी साजरी केली. या दिवाळीत फटाके मोठ्या उत्साहाने उडवले गेले. मराठीतील श्रेष्ठ कवी केशवसुतांनी लिहिलेल्या 'दिवाळी' या कवितेत चिनी या शब्दाचा उल्लेख आहे. फटाक्यांचे चीन कनेक्शन उलगडून दाखवणारा ज्येष्ठ अभ्यासक प्रमोद बापट यांचा लेख - संपादक*

दीपावलीच्या निमित्ताने आनंद दहा वाटांनी आपल्याकडे येत असतो, आपली घरे-मने उजळून टाकत असतो.

आनंद गाडगीळ हा आमचा साहित्यरसिक मित्र. त्याने दिवाळीच्या अनेकानेक आनंदवाटा शब्दांकित करणाऱ्या कविश्रेष्ठ केशवसुतांच्या एका कवितेचं स्मरण करून दिलं. 'दिवाळी' हेच शीर्षक असलेल्या त्या मूळ एकवीस चौकांच्या (चार चरणांचा एक चौक = कडवं) दीर्घ कवितेतील दोन चौक उद्धृत केले. मग आनंदाची पूर्ण माळ लागावी तसं आम्ही सर्वांनी पूर्ण कवितेचं स्मरण केलं. त्यामधील एका चरणात फटाक्यांचा उल्लेख आला. त्यातील चिनी ह्या विशेषणाच्या अनुषंगाने समीर जोगळेकर ह्या दुसऱ्या व्यासंगी मित्राने टिपण लिहिलं, काही पृच्छा केली. केशवसुतांनी लिहिलं आहे :

**''उंची कापड, दागिने सुबकही, मेवे, फटाके चिनी**
**यांचा विक्रय होतसे धडकुनी वस्तू न चाले जुनी!''**

ह्या उल्लेखाने एका गौरवपूर्ण पुरुषार्थाचं स्मरण झालं.

शंभर वर्षांपूर्वी पी. अय्या आणि षण्मुगा हे नाडर बंधू काडेपेट्यांच्या निर्मितीचं तंत्रज्ञान शिकण्यासाठी कलकत्त्यात आले आणि तमिळनाडूतील शिवकाशी या अलक्षित गावाचे भाग्यच डोळे दीपविणारा उंचच उंच झळाळ उभा करणाऱ्या एखाद्या चंद्रज्योती नळ्यासारखे झगमगून गेले. केवळ आठच महिने कलकत्त्यात राहून नाडर बंधुंनी आगीच्या खेळाचं तंत्र आत्मसात केलं




आणि आपल्या काळ्या मातीच्या अवर्षणग्रस्त गावातून भारतभर धूर निघेल अशा वैभवी उद्योगाचा पाया रचला. आरंभी अनिल आणि अय्यन अशा दोन नावांच्या काडेपेट्यांचे उत्पादन सुरू केलं आणि जोडीला फटाक्यांची धूमधडाक्यात निर्मिती सुरू केली.




*भारतातील पहिलं स्वदेशी फटाक्याचं उत्पादन 'अनिल'*

... आणि शिवकाशीचं भाग्यच पालटलं. एकेकाळी काही घरात चालणाऱ्या मागांवर आपल्या आयुष्याची विरविरती वस्त्रे विणणाऱ्या गावात कुणी आपली मुलगी देत नसे तिथे भाग्याने असे दिवस दाखवले की, आज

देशभरातील विवाहांसहित सर्वच उत्सवपर्वात हे गाव रोषणाईची साधने पुरवते.

नाडर बंधुंच्या ह्या फटाक्याच्या कारखान्याने शिवकाशी गावात लक्ष्मी आणली. हे वाढतं वैभव गोऱ्या साहेबाच्या निळ्या डोळ्यांतही इतकं भरलं की, १९३४ मध्ये ह्या उद्योगावर अबकारी कर आकारणी सुरू झाली.



कै अय्या नाडर व पत्नी जानकी

परंतु १९४२ पर्यंत हा एकच कारखाना होता. पहिल्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या ह्या भारतातील एकमेव कारखान्याला खूप संघर्ष करावा लागला. ह्या अवरोधाला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उभे राहिलेले 'क्रांतिकल्लोळ' हे एक प्रमुख कारण होतं. त्याचबरोबर यंत्रसामग्रीपासून फटाक्याच्या दारूपर्यंत सर्वच गोष्टी आयात कराव्या लागत होत्या. फटाक्याच्या दारूच्या आणि फटाक्यांच्याही निर्मितीत चीनचा मोठा पारंपरिक वाटा होता. तिथून युरोपात मोठा पुरवठा होत असे. पुढे ब्रिटन आणि जर्मनी हेच दोन देश जगभरासाठी निर्यातदार होते. आणि नेमके तेच दोन देश महायुद्धाने होरपळून गेले होते. स्वाभाविकच त्याचा दुष्परिणाम कारखान्याच्या व्यवसाय वृद्धीवर होत होता.

१९४० मध्ये ब्रिटिशांनी फटाके आणि एकूणच स्फोटकांच्या व्यवसायाला उद्योगाच्या पायरीवर आणत स्वतंत्र अनुमतीपत्राची व्यवस्था उभी केली. त्यामुळे दुसरा कारखाना उभा राहण्यासाठी १९४२ हे वर्ष उजाडावं लागलं. त्या वर्षी नॅशनल, कालीश्वरी, स्टँडर्ड फायरवर्क्स अशा नावाचे आणखी तीन कारखाने, त्यापैकी एक शिवकाशीत तर दोन कारखाने केरळात उभे राहिले. दुसऱ्या महायुद्धाने लादलेल्या निर्यातबंदीने १९४४ पर्यंत पुढची वाट अशीच रोखली. पुढच्या पंचवीस-तीस वर्षांत उद्योगजगतात बरीच गती आली आणि १९८० पर्यंत कारखान्यांची संख्या शतक पार करीत १८९ झाली. १९९० नंतरच्या मुक्त व्यापारपर्वात मोठी झेप घेत ४५० कारखान्यांतून जल्लोषसाधनं निर्माण होऊ लागली. आज भारतातील फटाके निर्मितीच्या शताब्दीवर्षात एकट्या जन्मभूमी शिवकाशीत तब्बल ६४० कारखान्यांतून फटाक्यांची निर्मिती होत आहे. कारखान्यांबरोबरच घराघरांतून उबदार धाग्यातून वस्त्र विणणारे हात फटाक्यांच्या उग्ररम्य निर्मितीत आता गुंतलेले असतात. त्यामुळे केवळ कारखाने नव्हेत, तर शिवकाशीतील घरेघरे ही उद्योगलक्ष्मीची मंदिरे झाली आहेत.



आज काही हजार कोटींचा व्यवसाय एकट्या शिवकाशीतून होत आहे. उत्तरेतील शिवाच्या काशीत परंपरेनेच ज्ञानाची दिवाळी होत आली आहे. तर दक्षिणेतील शिवाच्या ह्या वर्षानुवर्षे अलक्षित असलेल्या शिवकाशीत फटाक्यांच्या भारतव्यापी रौद्ररम्य दिवाळीची उग्रमंगल साधननिर्मिती होते आहे.

१९०० ह्या वर्षी केशवसुतांनी लिहिलेल्या 'दिवाळी' ह्या कवितेतील एका चरणाने, खरं तर त्यातील

'चिनी' ह्या एका उणीव बोचरी करणाऱ्या विशेषणाने ही स्मरणगाठ उलगडली. एकेकाळी परवशतेमुळे आमच्या सर्वच आनंदावर परकीय पहारे पडले होते. पारतंत्र्य नष्ट करण्यासाठी आमचे आम्हीही काही निर्बंध व्रतस्थपणे पाळत होतो. स्वा. सावरकरांनी त्यांच्या 'दिपवाळीचें लक्ष्मीपूजन' ह्या जाग आणणाऱ्या कवितेतून त्या व्रताची तत्कालीन समाजाला आठवणही करून दिली होती. त्याही दीर्घ कवितेतील फटाक्यांचा संदर्भ असलेल्या काही पंक्ती अशा होत्या :

**''आणि विदेशी नळे फटाके फुलबाजा अंती**
**उडवुनि डिंडिम पिटू आपल्या मौर्ख्याचा जगती ।।**
**अहो हिंदूंनो, कोटि कोटि रुपयांची या दिवशी**
**लक्ष्मी पुजावयासी लक्ष्मी धाडू विदेशासी ।।**
**म्हणुनि अम्हि जरि पुजू घरोघर ही लक्ष्मी भावे**
**प्रसन्न पूजेने ना होतां लक्ष्मी रागावे ।।''**

सावरकर १९२५ मध्ये ही कविता लिहीत होते नेमका तेव्हाच.. एखादं वर्ष आधी अय्या नाडर नावाच्या जेमतेम विशीच्या तरुणाने स्वदेशी लक्ष्मीपूजनाचा शुभारंभ केला होता.

शिवकाशीतील स्वदेशी उद्योगसाधनेच्या बळावर आम्ही आमची लक्ष्मी घराबाहेर जाऊ देत नाही. आता फटाक्यांच्या आतषबाजीने उजळणारा आमचा आनंद त्यातून होणाऱ्या प्रदूषणाने काळवंडून जाणार नाही ह्याची निश्चिती हवी आहे. पहिलं आव्हान पेललं, उलथवूनही टाकलं, तसंच हे नवं आव्हानही त्याला विज्ञानवान होत, सामोरे जात आम्ही निश्चित पेलू, त्यावर मात करू.

कारण ते निमित्त पुढे करीत आमच्या श्रेष्ठ परंपरा, उत्सव यांच्यावर आघात करणारे भारतशत्रूही बिळातून बाहेर येत ढोलताशे बडवतात. नव्या प्रदूषणमुक्त फटाक्यांच्या धमाक्याने त्या घुशींची चुळबुळही थंडावेल.

१९२३ मध्ये सुरू झालेली ही उग्रमंगल, रौद्ररम्य उद्योगसाधना आता शतायुषी झाली आहे. ह्या शताब्दीपर्वानिमित्त ह्या उद्योगलक्ष्मीदेवीकडे आजच्या भारताचं हेच नवं मागणं आहे.

**– प्रमोद वसंत बापट**

•••

---

(पृष्ठ क्र. २ वरुन - **संपादकीय**)

तेव्हा श्रीमती इंदिरा गांधी या कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या. यावरून अल्पावधीत या विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात आपले किती चांगले बस्तान बसविले याची कल्पना येईल.

'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था आणि एसएनडीटी विद्यापीठ' या दोन शिक्षण संस्थांनी महिला शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या संस्थांच्या उभारणीसाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी अण्णासाहेब कर्व्यांनी आपले आयुष्य वेचले. देशात तसेच परदेशात मिशनरी बाण्याने वणवण केली. देणगी मागायला गेल्यावर अनेकदा त्यांना अपमान सहन करावे लागले. परंतु ते पचवून स्त्री उद्धाराचे कार्य अण्णासाहेब जन्मभर करीत राहिले. महर्षी कर्वे यांचे आयुष्य संस्थामय होते असेच म्हणावे लागेल. वरील उल्लेखिलेल्या दोन संस्थांखेरीज 'मुरूड फंड' (१८८६), स्त्रियांच्या उद्धारासाठी आमरण कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण व्हावेत म्हणून काढलेला 'निष्काम मठ' (१९१०), ग्रामीण शिक्षणासाठी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' (१९३६), जातिभेद आणि अस्पृश्यता यांच्या निर्मूलनाच्या उद्दिष्टाने काढलेला 'समता-संघ' (१९४४) इ. संस्था त्यांनी स्थापन केल्या. त्यांचे आत्मवृत्त १९१५ मध्ये प्रकाशित झाले असून, ते अत्यंत उद्बोधक आहे. ते आपण आवर्जून वाचावे असे मी सुचवू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

---

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### इंडियन स्वच्छता लिंग - २०२३

दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी ठाणे महानगर पालिका आणि 'ठाणे वैभव' यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंडियन स्वच्छता लिंग २०२३' अंतर्गत ठाण्यातील शाळांनी दादोजी कोंडदेव स्टेडिअम येथे सहभाग घेतला. यात प्रख्यात सिने-अभिनेता प्रशांत दामले यांनी सगळ्यांना 'स्वच्छ ठाणे' संदर्भात शपथ दिली. विविध मनोरंजक कार्यक्रम झाले. 'इंडियन स्वच्छता लिंग' अंतर्गत गणपतीची मूर्ती तयार करणे ही स्पर्धा घेण्यात आली. निवडक ५ शाळांमधून आपल्या शाळेने 'टाकाऊ पासून टिकाऊ' असा प्रकल्प सादर केला.



इतर मान्यवरांबरोबर हास्यजत्रा फेम भाऊ कदम उपस्थित होते. सदर कार्यक्रमात आपल्या शाळेतील ६८ विद्यार्थ्यांसोबत श्री. तळेले, श्री. खैरनार, श्री. देवघरे, श्री. शिरापुरी, श्री. दिघे, श्री. देसले, सौ. गांगुर्डे, सौ. जोशी, सौ. तातळे, सौ. भोईर, सौ. रोंगटे इ. शिक्षक, तसेच श्री. बागुल, श्री. मांजरेकर हे शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### ठाणे वैभव

ठाणे वैभव यांचा 'एक मिनिट ठाणे' या उपक्रमांतर्गत आपले ठाणे शहर स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी आपण एक मिनिटाचे योगदान प्रत्येकाने द्यावयास हवे याबद्दल जनजागृती व्हावी यासाठी दि. १३ सप्टें.२०२३ रोजी दोन्ही विभागांत सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना 'स्वच्छतेची शपथ' देण्यात आली. तसेच 'एक मिनिट ठगण्यासाठी' हा व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या अभ्यासगटावर शेअर करण्यात आला. आपले ठाणे शहर स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणते प्रयत्न केले त्या संदर्भातील त्यांचे व्हिडिओ सादर केले गेले.



### स्वच्छता पंधरवडा

दि. १ सप्टें. ते १५ सप्टें. २०२३ हा पंधरवडा 'स्वच्छता पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात आला. यात विविध उपक्रम राबविले गेले. 'स्वच्छतेची शपथ' सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना देण्यात आली. चित्रकला व निबंधस्पर्धा घेण्यात आली. पालक सभेचे आयोजन करून पालकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

**पर्यावरण दक्षता मंडळ आयोजित 'निसर्ग मेळावा'**

दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी पर्यावरण दक्षता विभाग आयोजित 'निसर्ग मेळावा' या उपक्रमात 'पर्यावरण गीत स्पर्धेत एक निसर्ग गीत' इ. ६ वी ते इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि सौ. कुलकर्णी संगीत शिक्षिका यांनी रचलेले निसर्ग गीत ('झाडे लावू या झाडे जगवू या') सादर केले.

**मानसिक आरोग्य दिन (Mental Health Day)**

दि. १०/१०/२०२३ या दिवशी मानसिक आरोग्य दिन असतो. यानिमित्त इ.९वी व इ.६वी च्या विद्यार्थ्यांना Mental Health Awareness साठी महत्त्वपूर्ण टीप्स व U-tube च्या माध्यमातून दिल्या गेल्या. दैनंदिन व्यायाम, शेअरींग, चॉईस गुड-कंपनी, स्वतःसाठी पुरेसा वेळ अशा महत्त्वाच्या टीप्स होत्या.

**१५ ऑक्टोबर -'जागतिक - हात धुवा दिन'**

सोमवार दि. १६ ऑक्टोबर रोजी २०२३ 'जागतिक - हात धुवा दिन' साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाची सुरुवात दिनविशेष सांगून झाली. काही निवडक विद्यार्थ्यांनी हात का व कसे व कधी धुवावे? याबाबत माहिती सांगितली. तसेच हात धुण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रात्यक्षिकात मार्गदर्शन केल्याप्रमाणे हात धुऊन दाखविले. स्वच्छतेचे महत्त्व सांगून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूत्रसंचालन कु. मृण्मयी भोसले हिने केले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका कु. कल्पना वाघुले या वेळी उपस्थित होत्या.

**शारदोत्सव निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन**

दि १७/१०/२०२३ रोजी शारदोत्सव निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. इ. ५ वी व ६ वी साठी 'वेशभूषा स्पर्धा', इ. ७ वी व ८ वी साठी 'फुलांची रांगोळी स्पर्धा' आणि ९ वी १० वी साठी 'भोंडल्याची गाणी' या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. पालकांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**पोळा / मातृदिन - (१४ सप्टेंबर)**

श्रावण अमावस्या 'पोळा', म्हणून आपले शेतकरी बांधव उत्साहात साजरा करतात. शेतीच्या कामात मदत करणाऱ्या बैलांना सजवून त्याची पूजा करून पुरणपोळी खायला देण्यात येते.

हा दिवस मातृदिन म्हणूनही साजरा करण्यात येतो. पोळा, मातृदिन व अमावस्या म्हणजे काय याबद्दलची माहिती शिक्षकांनी परिपाठात दिली.

**गणपती - (१५ सप्टेंबर)**

१८ सप्टेंबर पासून सर्वत्र साजरा होणारा गणपतीचा सण शुक्रवार १५ सप्टेंबर रोजी शाळेत अतिशय उत्साहात साजरा झाला.

गणपतीची मूर्ती शाडूची असावी, केली जाणारी आरास कशी असावी याची महिती आधीच मुलांना देण्यात आली.

१५ ता. ला मुलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. सेकंडरी विभागाच्या मुलांचे लेझीम व ढोल पथक आणि आमच्या चिमुकल्यांच्या झांजा अशा थाटात आमच्या गणपतीबाप्पाचे आगमन झाले. मुलांच्या हातांचे ठसे व त्यापासून शिक्षकांनी केलेली फुले, फुलपाखरे अशी सुंदर आरास बाप्पासाठी केली होती. गणपतीची पूजा, आरती, श्लोक म्हणून मुलांनी प्रार्थना केली. मुलांनी बाप्पाची गाणी गायली. तळलेला मोदक मुलांना प्रसाद म्हणून देण्यात आला. प्रायमरीच्या

मुलांच्या लेझीम पथकाबरोबर सिनीयरच्या मुलांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असे म्हणत पर्यावरणपूरक पद्धतीने बाप्पाचे विसर्जन केले.

नर्सरीच्या मुलांनी – मोदकाच्या चित्रावर कांद्याने तर जास्वंदीच्या फुलावर झेंडूच्या फुलाने प्रिंट केले.

ज्यूनियरच्या मुलांनी – चिकणमातीचा मोदक तयार केला.

सिनीयरच्या मुलांनी – चिकणमातीचा गणपती तयार केला व वर्तमानपत्रातून गणपतीचे चित्र कापून ते चित्रकलेच्या वहीत चिकटवले. त्याच्या आजूबाजूला सजावट केली.

- ए. व्ही. तासिकेला गणपतीची गाणी व गोष्टी मुलांना दाखवण्यात आल्या.
- पुस्तकातील गणपतीच्या गोष्टी शिक्षकांनी मुलांना वाचून दाखवल्या.
- गणपतीच्या चित्रांनी व तक्ते लावून वर्ग व व्हरांड्यात सुशोभीकरण केले गेले होते.

**६ ऑक्टोबर – वेशभूषा दिवस**

नर्सरी व ज्यूनियर – कोणताही आरामदायक पोषाख – वेशभूषा.

सिनीयर – कोणतेही कार्टून, व्यक्तिरेखा किंवा आपले मदतनीस.

पालकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी विविध पोषाख घालून त्याला अनुसरुन ३/४ वाक्यात त्याविषयी माहिती दिली.

**७ ऑक्टोबर – पालक सभा**

नर्सरी व ज्यूनियर – सकाळी १०:३० ते ११:००

सिनीयर – सकाळी ११:३० ते १२:००

या सत्रातील शेवटची पालक सभा शनिवार ७ ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आली या सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या प्रथम निरीक्षणाचे वेळापत्रक, तसेच सविस्तर माहिती पालकांना देण्यात आली.

**१३ ऑक्टोबर – पोळ्या लाटणे**

भिजवलेल्या कणकेचे शिक्षकांनी गोळे करून दिले व मुलांनी त्याच्या पोळ्या लाटण्याचा आनंद लुटला.

**१५ ऑक्टोबर – २४ ऑक्टोबर – नवरात्र.**

**(शाळेत १६ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर दरम्यान साजरे करण्यात आले)**

देवीची विविध रूपे, तिची नावे चिन्हांसहित मुलांना सांगितली गेली. रोज नवनवीन रंगांचे कपडे मुलांनी परिधान केले होते. या दरम्यान खेळले जाणारे गरबा, दांडिया व भोंडला याची माहिती शिक्षकांनी मुलांना दिली. देवीचे श्लोक या दरम्यान रोज मुलं म्हणत होती. २० ऑक्टोबरला शाळेत भोंडला खेळला गेला. लिटील हार्टस् बिस्किटाची पाकिटे मुलांना खिरापत म्हणून दिली गेली.

नर्सरीच्या मुलांनी – हत्तीचे चित्र रंगवले.

ज्यूनियरच्या मुलांनी – १ आकड्याची सरस्वती रंगवली.

**२३ ऑक्टोबर – दसरा**

नवरात्रीचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा. दसऱ्याच्या दिवशी केले जाणारे सरस्वती पूजन, दिले जाणारे आपट्याचे पान याची माहिती शिक्षकांनी दिली. 'या कुन्दे' श्लोक म्हणून मुलांनी सरस्वतीपूजन केले.

या दिवशी सिनियरच्या प्रत्येक मुलाने १ झेंडूचे फुल व १ आंब्याचे पान आणून शिक्षकांच्या सहायाने

सुंदर तोरणं तयार केली. सर्व वर्गांच्या दारावर ही तोरणं लावण्यात आली.

**२८ ऑक्टोबर – कोजागिरी पौर्णिमा**

अश्विन पौर्णिमा कोजागिरी पौर्णिमा म्हणून साजरी करतात. पौर्णिमा म्हणजे काय, त्याचे महत्त्व शिक्षकांनी सांगितले चांदोमामाचे गाणे मुलांनी गायले.

**२५ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर – प्रथम निरीक्षण (1st Observation)**

या काळात विविध विषयांत शिकवलेल्या संकल्पनांवर आधारित निरीक्षण घेतले गेले. गणितातील काही संकल्पनांसाठी कार्यपत्रिका (worksheet) देण्यात आल्या. तर भाषा, परिसर अभ्यास शारीरिक शिक्षण या करिता तोंडी व कृतीद्वारे करण्यात आलेल्या कृतींवर निरीक्षण नोंदवण्यात आले याचे प्रगतीपुस्तक पुढील सत्रात पालकांना देण्यात येईल.

**७ नोव्हेंबर – दिवाळी**

वसुबारसेपासून भाऊबीजेपर्यंत साजरा होणारा हा दिव्यांचा सण. सुंदर रांगोळी, कंदील आणि पणत्यांनी पूर्वप्राथमिक विभागाच्या प्रवेशाजवळ सजावट करण्यात आली होती. विविध चित्रं, रांगोळ्या, पणत्या, यांनी पूर्णविभाग सजला होता. मुलांनी नवीन कपडे घातले होते. विविध गाण्यांवर मुलांनी नृत्य केले. बेसन लाडू व चकली असा खाऊ मुलांना दिला.

नर्सरीच्या के. जी. – कागदाच्या पणत्या करणे.

ज्यूनियर के. जी. – घोटीव कागदाच्या पणत्या करणे.

सिनियर के. जी. – रांगोळीचे चित्र रंगवणे.

वरील उपक्रम घेण्यात आले.

अशा तऱ्हेने पहिल्या सत्राची सांगता झाली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**कब बुलबुल सोहळा**

इयत्ता २री च्या विद्यार्थ्यांचा ४ सप्टेंबर रोजी कब–बुलबुल शपथविधी सोहळा संपन्न झाला.

'स्काउट–गाईड' या जागतिक चळवळी अंतर्गत लहान मुलांसाठी कब–बुलबुल आहे. कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका व कब–बुलबुल शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत शपथ घेतली. विद्यार्थ्यांना या जागतिक चळवळीचे पदक व स्कार्फ देऊन सभासदत्व देण्यात आले. विद्यार्थ्यांना ते एका जागतिक चळवळीचे सभासद झाले आहेत, ह्याबद्दल माहिती मिळाल्यावर त्यांना विशेष आनंद झाला. विद्यार्थ्यांना सभासदत्व मिळाल्याच्या आनंदात त्यांचे तोंड गोड करण्यात आले.

अशाप्रकारे कब–बुलबुल शपथविधी सोहळा शिस्तीत संपन्न झाला.

**स्त्री कल्याण संघटना**

**वक्तृत्व स्पर्धा**

श्री समर्थ सेवा मंडळाच्या स्त्री कल्याण संघटनेद्वारे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेसाठी इ. १ली व २री ला 'माझे आवडते खेळणे' व 'माझे आजोबा' हे विषय होते. इ. ३री व ४थी साठी 'बिरबलची कथा' व 'माझ्या घरी गणपती येतोय' हे विषय होते.

या स्पर्धेत शाळेतील पुढील विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभा उतेकर | १ली | प्रथम |
| २ | कु. पार्थ देशमुख | ३री | प्रथम |
| ३ | कु. रेवा पिंपळे | ४थी | प्रथम |
| ४ | कु. मिहिका काळे | ४थी | प्रथम |
| ५ | कु. रिवा गडा | २री | द्वितीय |
| ६ | कु. अर्जुन लेले | ३री | द्वितीय |
| ७ | कु. आर्वी कुलकर्णी | १ली | उत्तेजनार्थ |

**नवरात्र**

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते**

दैत्यांचा संहार करणाऱ्या शक्तीरुपाची आराधना केली जाते तो सण म्हणजे 'नवरात्र'. नवरात्र उत्सव प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी खूप छान साजरा केला. विद्यार्थ्यांनी लयबद्धपणे महिषासूर मर्दिनी स्तोत्र सादर केले. तसेच महिषासूर राक्षसाची कथा सांगितली. नवरात्रीची छान आरती म्हणाले. त्याचबरोबर दसऱ्याचे महत्त्व आणि रावण दहनाची कथा सांगितली. इ. १ली ते ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी गरबा नृत्याचा मनसोक्त आनंद लुटला.

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

**विविध कार्यक्रमांचा अहवाल**

**महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्राप्त, – सत्कार आणि पुरस्कार**

बी.ए.एम.एम.सी. विभागचे प्राध्यापक तसेच उप–प्राचार्य आणि समन्वयक डॉ. महेश पाटील यांना Inspiring Education Hero या पुरस्काराने EGN India या संस्थेद्वारे श्री. मुकुल कोळी CEO, EGN INDIA यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

बी.ए.एम.एम.सी. विभागाच्या प्रा. विमुक्त राजे यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल ठाणे येथील हिंदू जागृती नवरात्रोत्सव मंडळातर्फे 'नवदुर्गा' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जिमखाना विभागाच्या रोहिणी डोंबे यांना क्रीडा क्षेत्रातील योगदाना बद्दल ठाणे येथील हिंदू जागृती नवरात्रोत्सव मंडळातर्फे 'नवदुर्गा' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'साहित्य संगम प्रतिष्ठान मुलुंड' यांच्यावतीने डॉ. प्रकाश जंगले यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' कवी अरुण म्हात्रे आणि उप–आयुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

**विविध कार्यक्रमांचा अहवाल**

दिनांक ५/१०/२०२३ : Financial Markets विभागातर्फे Financial Literacy World Investestor Week Campaign चे आयोजन करण्यात आले होते.

एन.एस.एस. तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सिव्हील हॉस्पिटलच्या कर्मचारी आणि एन एस.एस. चे सर्व विद्यार्थी मिळून शिबिर आयोजित केले होते. एकूण ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

दिनांक ६/१०/२०२३ : तत्त्वज्ञान, इंग्रजी आणि मराठी विभाग मिळून ओल्या कचऱ्याचे नियोजन या सदरा अंतर्गत सैन्द्रीय खत निर्माण करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

बँकिंग सेक्टर मध्ये विद्यार्थ्यांना संधी या अन्तर्गत विविध स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी यावर श्री. अशोक मिश्रा यांच्या व्याख्यानांचे आयोजन अर्थशास्त्र विभागातर्फे करण्यात आले होते.

गांधी जयंतीच्या निमित्ताने तत्त्वज्ञान विभागातर्फे Social Engineering through Gandhian Principles या विषयावर दृक श्राव्य माध्यमाने डॉ. नमिता निमाबाळकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

एम कॉम business management तर्फे World Tourism Day साजरा करण्यात आला.

दिनांक ७/१०/२०२३ : राज्यशास्त्र विभागातर्फे समूह भजन गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात एकूण २७ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला.

'पंचायत राज महाराष्ट्रात कसे कार्य करते?' या विषयावर श्री. पंजाबराव घायरे आणि श्रीमती. वासंती महाले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

इतिहास आणि संकृत विभागातर्फे Evolving Knowledge and Education system in India from Ancient to Contemporary Times या संकल्पने खाली डॉ. वैशाली दाबके यांचे 'स्तोत्र साहित्य' आणि डॉ. पल्लवी नलावडे यांचे 'पाषाण शिल्प रचना' या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दिनांक ९/१०/२०२३ : Sharing of Spontaneous thought on Mahatma Gandhi हा कार्यक्रम B. Voc विभागाने आयोजित केला होता.

Creativity and Innovation as a Business Strategy या विषयावर SYBMS च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. विभूती सावे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दिनांक १०/१०/२०२३ : World Investor week campaign २०२३ च्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम :-

World Investor week campaign २०२३ च्या अनुषंगाने इ.com Financial Markets तर्फे E-Quiz on Investor Awarenes चे आयोजन करण्यात आले यात १४१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. याच अंतर्गत 'म्युचल फंड सही है' या विषयावर विद्यार्थ्यांचे चर्चा सत्र आयोजित करण्यात आले.

पोस्टर आणि मोडेलचे प्रदर्शन याच कार्यक्रमांतर्गत भरविण्यात आले होते.

प्ले ऑन फायनानसिअल प्लांनिग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

Department of B.com Accounting Finance तर्फे Non Violence Awareness चे आयोजन करण्यात आले.

भूगोल विभागातर्फे बेडीस्गाव येथे फिल्ड सहल भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक ११/१०/२०२३ : Department of B.com Accounting Finance तर्फे महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी निमित्त प्रश्न मंजुषेचे आयोजन करण्यात आले.

भूगोल विभागातर्फे 'भारतीय ग्रामीण खाद्य संस्कृतीचे प्रदर्शन' भरविण्यात आले. या प्रसंगी भारतातील विविध प्रांतांतील खाद्य पदार्थांचे stall लावले होते. यास सर्व प्राध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

'खादी प्रमोशन समिती' तर्फे बुक मार्क बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली.

बी. एम. एस. विभागातर्फे 'Mathematics and Statistics' या विषयावर Bridge Course चे आयोजन करण्यात आले.

दिनांक १२/१०/२०२३ : Department of B.com Accounting Finance तर्फे Poster तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली व Environmental Studies (Value Education Course) चे आयोजन करण्यात आले.

दिनांक १३/१०/२०२३ : Garbage free India या अंतर्गत महाविद्यालयातील परिसर स्वच्छतेचे आयोजन डी.एल.एल.इ. समितीतर्फे करण्यास तसेच 'समुद्र किनारा स्वच्छता अभियान' करण्यात आले.

दिनांक १३/१०/२०२३ : B.Com Financial Markets तर्फे Equity Derivative Dealer या विषयावर आठ दिवसांचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.

दिनांक १९/१०/२०२३ : मराठी विभाग आणि स्टाफ अकॅडेमी तर्फे 'रानकवीची स्मरणयात्रा' या कार्यक्रमांतर्गत ना.धों. महानोर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कवितांचे वाचन आणि गायन विद्याथी तसेच शिक्षकांनी केले.

सांस्कृतिक समिती तर्फे 'भोंडला' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर सर्व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन उत्साहात भोंडल्याची गाणी गायली.

खादी समिती तर्फे श्रीमती आर. विमला (CEO महाराष्ट्र राज्य आणि ग्रामीण औद्योगिक विभाग) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २०/१०/२०२३ : 'मेरी माटी मेरा देश' या अंतर्गत एन.एस.एस. समिती द्वारे स्व-छायाचित्र कार्यक्रम करण्यात आला.

'मेरी माटी मेरा देश' या अंतर्गत एन.एस.एस. समिती 'अमृत कलश यात्रा' हा कार्यक्रम करण्यात आला.

दिनांक २१/१०/२०२३ : Department of B.Com - Accounting Finance तर्फे 'ठाणे भारत सहकारी बँकेत' विद्यार्थ्यांची भेट करवून तेथील कामकाज कसे चालते याचे प्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले.

दिनांक २२/१०/२०२३ : Department of B.Com Accounting Finance तर्फे PPT/ नाट्य प्रदर्शन तसेच Financial Inclusion Schemes in India चे आयोजन करण्यात आले.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उप-प्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील तसेच सर्व समन्वयक, सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी वर्ग या सर्वांचे अथक प्रयत्न मार्गदर्शन प्रोत्साहन लाभले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### विद्यार्थ्यांचे कौतुकास्पद यश

महाविद्यालयाच्या अमोल चौघुले या विद्यार्थ्याने लिहिलेली कविता 'Author of the Bharat' या पुस्तिकेमध्ये निवडली गेली. या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. त्यामध्ये 'यू अँड मी' या मथळ्याखाली कविता सादर करायची होती. त्यामध्ये अमोल चौगुले बीएससी प्रथम वर्ष याची हिंदी कविता प्रकाशित झाली. त्याचे कौतुक म्हणून ब्लू स्टार च्या संपादकाने 'क्या तुम्हे भी मुझसे प्यार है' या सुंदर प्रेम कवितेसाठी प्रमाणपत्र, ट्रॉफी, सुवर्णपदक देऊन त्याचा सत्कार केला.



### ग्रंथालय विभाग

११ ऑक्टोबर २०२३ रोजी J-Gate Database Orientation या विषयावर श्री. भावेश शाह यांचे मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. J-Gate हा डाटाबेस कसा वापरावा याबद्दल विस्तृत

मार्गदर्शन श्री. भावेश शाह यांनी केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

१५ ऑक्टोबर २०२३ रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांच्या वरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ''मला आवडलेले पुस्तक'' याबद्दल आपले विचार मांडले. ६ विविध पुस्तकांचा परिचय या उपक्रमाअंतर्गत करून दिला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी पुस्तक परिचयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

नवरात्रीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाने विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये संशोधनाबद्दल रुची निर्माण व्हावी व संशोधनाकरिता आवश्यक माध्यमांबद्दल जागरूकता करण्याकरता "Awareness of Research Platforms" या विषयावर नऊ दिवस नऊ विविध माध्यमांचे भित्तीपत्रिकांच्या माध्यमातून प्रदर्शन भरविले.

१५ ऑक्टोबर २०२३ या प्रथम दिवशी "Google Scholar" या संशोधन माध्यमाबद्दल भित्तीपत्रिकेचे उद्घाटन श्री पंकज गोडसे, ग्रंथपाल, हिंदुजा व्यवस्थापन महाविद्यालय यांच्या हस्ते संपन्न झाले. ग्रंथपाल कादंबरी यांनी Google Scholar या माध्यमाबद्दल माहिती दिली व त्याचा संशोधनाकरिता कशा प्रकारे वापर करता येईल हे विस्तृतपणे सांगितले.

१६ ऑक्टोबर २०२३ रोजी "Research Gate" या संशोधन माध्यमाबद्दल भित्तीपत्रिकेचे उदघाटन डॉ. ऊर्मिला कुमावत सहाय्यक प्राध्यापक वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या हस्ते संपन्न झाले. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी Research Gate चे सदस्यत्व कसे घेता येईल व त्यामधील विशिष्ट बाबी याबद्दल माहिती दिली.

१७ ऑक्टोबर २०२३ रोजी "Academia" या संशोधन माध्यमाबद्दल, १८ ऑक्टोबर २०२३ रोजी "Shodhaganga", १९ ऑक्टोबर २०२३ रोजी "ORCid", २० ऑक्टोबर २०२३ रोजी "HINDAWI & DOAJ", २१ ऑक्टोबर २०२३ रोजी "Mendeley", २२ ऑक्टोबर २०२३ रोजी "Creative Commons" आणि २३ ऑक्टोबर २०२३ रोजी "VIDWAN" भित्तीपत्रिकेचे प्रदर्शन करण्यात आले होते.

विविध दर्जात्मक संशोधन साहित्य ओपन ऍक्सेस (मुक्त द्वार) माध्यमांमार्फत उपलब्ध आहेत. या प्रदर्शनांमधून या विविध ओपन ऍक्सेस माध्यमांचा विद्यार्थी व शिक्षकांना परिचय करून देण्यात आला. संशोधकाला संशोधन करण्याकरिता दर्जात्मक संशोधन साहित्य उपलब्ध करून देणे, आपल्या संशोधनाला प्रसिद्धी मिळवून देणे, अधिकाधिक संशोधकांबद्दल माहिती मिळवणे, विविध उच्च दर्जाच्या संशोधन संस्थांची माहिती कशा प्रकारे मिळवावी याबद्दल जागरूकता निर्माण करणे हेच मुख्य उद्दिष्ट या उपक्रमाचे होते.



१५ ऑक्टोबर २०२३ – Google Scholar



१६ ऑक्टोबर २०२३ – Research Gate




१७ ऑक्टोबर २०२३ – Academia




१८ ऑक्टोबर २०२३ – Shodhaganga




१९ ऑक्टोबर २०२३ – ORCid



२० ऑक्टोबर २०२३ – Hindawi DOAJ





२१ ऑक्टोबर २०२३ – Mendeley

२३ ऑक्टोबर २०२३ VIDWAN

## प्राणिशास्त्र विभाग

प्राणिशास्त्र विभागातर्फे १० जुलै २०२३ रोजी "Debate on Insect impact on life" या विषयावर डॉ विंदा मांजरमकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. कीटक आणि कीटकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या घटकांबद्दल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सदर व्याख्यानाला ३७ विद्यार्थी व १ शिक्षक उपस्थित होते.




## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा

प्राणिशास्त्र विभागातर्फे ३१ जुलै २०२३ रोजी 'आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन' साजरा करण्यात आला. डॉ विंदा मांजरमकर यांनी वाघांचे जैविक साखळीमधील महत्त्व सांगितले व वाघांचे नामशेष होण्यापासून संरक्षण करण्याचे महत्त्व विशद केले. सदर व्याख्यानाला ३७ विद्यार्थी व ५ शिक्षक उपस्थित होते.




## Webinar - Mastering the Art of writing a Research Paper : A Step-by-Step Guide

प्राणीशास्त्र विभाग आणि मानवी विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २७ जुलै २०२३ रोजी Mastering the Art of writing a Research Paper : - Step-by-Step Guide या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. डॉ. दिनेश वानुले, सहाय्यक प्राध्यापक, प्राणीशास्त्र विभाग, बी के बिर्ला कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय यांनी, 'संशोधन लेख कसा लिहावा?' याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला ७५ विद्यार्थी व ६ शिक्षक उपस्थित होते.




## आंतरराष्ट्रीय युवा दिन

प्राणिशास्त्र विभागातर्फे १२ ऑगस्ट २०२३ रोजी 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' साजरा करण्यात आला. डॉ विंदा मांजरमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानाला ४५ विद्यार्थी व ३ शिक्षक उपस्थित होते.

**Dr. Kusum Gokhale Memorial lecture**

प्राणिशास्त्र विभाग, पर्यावरणशास्त्र विभाग व जैव विविधता व वन्यजीव संवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ ऑगस्ट २०२३ रोजी Dr. Kusum Gokhale Memorial lecture संपन्न झाले. डॉ कुसुम यांनी खाडीच्या स्वच्छतेवरील केलेल्या कामाचा विस्तृत परिचय डॉ मीनाक्षी गुरव, यांनी दिला.

१९ ऑक्टोबर २०२३ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या प्रथम वर्ष तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांकरिता "Demonstration of biological instruments" प्रयोगशाळा भेट आयोजित करण्यात आली होती. जीवशास्त्राशी संबंधित उपकरणांची ओळख होण्याच्या दृष्टीने ही भेट आयोजित करण्यात आलेली होती. तंत्रनिकेतनचे २८ विद्यार्थी यामध्ये सहभागी होते.

**राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना**

वि.प्र.मं.चे बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय ठाणे येथे १६ सप्टेंबर २०२३ रोजी ठाणे खाडी येथे TMC आणि envro Vigil NGO सोबत मेगा क्लीनलीनेस ड्राईव्हचे आयोजन केले आणि खाडीतील सर्व कचरा गोळा केला, या समुद्रकिनारी स्वच्छता मोहिमेत आमचे ३२ कॅडेट्स सहभागी झाले होते.

२२ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी क्योटो सान्गयो विद्यापीठ, जपान या विद्यार्थ्यांकरिता संवाद सत्र व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

१२ सप्टेंबर २०२३ रोजी Anti Ragging Day या दिवसानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते या व्याख्यानाला १३८ विद्यार्थी उपस्थित होते.

२४ ऑगस्ट रोजी या "Personality Development Grooming Menstrual Hygiene and Body Language" विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कु. अवनी सोमय्या यांनी "Menstrual Hygiene Body Language" याबद्दल मार्गदर्शन केले तसेच उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

रत्नागिरी जिल्हा ग्राहक आयोगाचे माननीय अध्यक्ष म्हणून माजी प्राध्यापक सदस्य श्री अरुण गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे, त्यांनी १२ ऑक्टोबर २०२३ रोजी पदभार स्वीकारला.



**गरवारे इन्स्टिटयूट : ''पत्रकारितेसाठी उपयुक्त कायदेशीर संकल्पना'' व्याख्यान**

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठाच्या गरवारे



व्यवसाय शिक्षण व विकास संस्थाच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी मुंबई विद्यापीठातील कुसुमाग्रज भवन येथे ''पत्रकारितेसाठी उपयुक्त कायदेशीर संकल्पना'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापिका ॲड. रश्मी नाटेकर ह्यांनी ''माध्यमांचे स्वातंत्र्य: एक मूलभूत अधिकार'' ह्या विषयावर उपस्थिताना मार्गदर्शन केले.



दैनिक महाराष्ट्र सम्राट

माध्यमकर्मींना कायद्याचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक : प्रा. रश्मी नाटेकर

**एक दिवसीय चर्चासत्र : Arbitration and Mediation**

२१ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाने लवाद आणि मध्यस्थता Arbitration and Mediation या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते (दु. १.३० ते रात्री ८.००pm) त्यात खालील चार सत्रे आयोजित करण्यात आली होती.

शनिवार, दिनांक: २१/१०/२०२३ रोजी दुपारी १.३० ते रात्री ८.०० वाजता 'लवाद आणि मध्यस्थी' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. सदर चर्चासत्र मुटकोर्ट सभागृह येथे पार पडले. लवाद किंवा मध्यस्थी या सोप्या आणि कमी वेळखावू उपायांचा लाभ घेऊन वाद सोडवण्यासाठी पर्यायी मार्गाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी ह्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी त्यांच्यासाठी भविष्यातील करिअर मार्गांपैकी एक पर्याय म्हणून निवडू शकतात. शिवाय विद्यार्थ्यांना व्यावहारिक प्रशिक्षण II अभ्यासक्रमात ADR विषय आहे.

चर्चासत्रासाठी महाविद्यालयाने लवाद आणि मध्यस्थी क्षेत्रातील तज्ज्ञांना संसाधन - व्यक्ती म्हणून आमंत्रित केले होते.

**संसाधन - व्यक्ती**

- ॲड. श्री आशिष गोगटे, वरिष्ठ वकील, प्रमाणित आरबीट्रेटर, एशिया पॅसिफिक सेंटर फॉर आर्बिट्रेशन अँड मध्यस्थी.
- ॲड. श्रीमती लीना गोगटे वरिष्ठ अधिवक्ता, प्रमाणित आरबीट्रेटर, वैकल्पिक विवाद निराकरणातील प्रशिक्षक.
- श्री. संजय भाटे, माजी सत्र न्यायाधीश आणि सागरी कायद्याच्या विवादांसाठी पॅनेल केलेले आरबीट्रेटर
- डॉ. सुयश पाटणकर, प्लास्टिक सर्जन आणि प्रमाणित मध्यस्थ.
- कार्यक्रम वेळापत्रक.

| वेळ | विषय आणि संसाधन - व्यक्ती |
|---|---|
| 1.30p.m. | नोंदणी |
| 2.30p.m. | प्रभारी प्राचार्या डॉ श्रीमती श्रीविद्या जयाकुमार ह्यांच्या द्वारे चर्चा सत्राचे उद्‌घाटन आणि परिचय |
| 4.00p.m. | ॲड. श्री आशिष गोगटे, लवादाचे तत्त्वे, मूलभूत तत्त्वे आणि प्रक्रिया |
| 5.30 to 6.00p.m. | ब्रेक |
| 6.00p.m. | ॲड. श्रीमती लीना गोगटे, मध्यस्थी कायदा, २०२३ अंतर्गत मध्यस्थी तत्त्वे, मूलभूत तत्त्वे आणि प्रक्रिया |
| 7.00p.m. | श्री. संजय भाटे, माजी सत्र न्यायाधीश, सागरी कायदा विवादांसाठी लवाद |
| 7.20p.m. | डॉ. सुयश पाटणकर प्रश्नोत्तरे सत्र |
| 7.50p.m. | आभार प्रदर्शन आणि राष्ट्रगीत |



तृतीय वर्ष विधी चे विद्यार्थी कुमारी मनीषा झिटे आणि मिहीर कोळेकर ह्यांनी सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

### एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

सहाय्यक प्रा. कृष्णा कामत यांनी २३ ऑक्टोबर रोजी पुणे येथे ''महिला सक्षमीकरण आणि उच्च शिक्षण'' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेतला. उच्च तंत्रशिक्षण विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आला होता.



### प्रमाणपत्र कार्यक्रम

७ ऑक्टोबर रोजी सेमी III च्या विद्यार्थ्यांसाठी ''रिअल इस्टेट'' कायद्यातील प्रमाणपत्र कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. १० ऑक्टोबर रोजी ''कला रंगमंच आणि विधी साक्षरता'' या प्रमाणपत्र कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ विभाग आणि ठाणे डी.एल.एस.ए. सेक्टरी श्री सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

### स्टाफ अचिव्हमेंट :

व्हिजिटिंग फॅकल्टी श्रीमती रश्मी रोहित नाटेकर यांनी २६ ऑक्टोबर २०२३ ते २८ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत वकील खोज द्वारा आयोजित ''भारतातील सायबर कायदा आणि डिजिटल गुन्हे'' या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.


Vakeel Khoj

CERTIFICATE

OF COMPLETION

This certificate is proudly presented to

Rashmi Rohit Natekar

For Successfully Completing the "CERTIFICATE COURSE ON "CYBER LAW AND DIGITAL CRIMES IN INDIA". Organized by Vakeel Khoj under the guidance of Mr. Rohit Jain (Cyber Law Expert, Author, and Educator | High Court Practitioner | Award-Winning Author and Speaker | Advocate for Cybersecurity, Awareness) From:- 26th October 2023 to 28th October 2023.

DIKSHA DEVERA
Managing Partner Vakeel Khoj

MR. ROHIT JAIN
Advocate High Court of Madhya Pradesh

व्हिजिटिंग फॅक्लटी श्रीमती रश्मी नाटेकर यांचा ''भारतातील फ्रेंचाइजी व्यवसायाचे कायदेशीर पैलू'' हा पेपर १० ऑक्टोबर २०२३ रोजी Jus Corpus Law Journal ISSN 2582-7820 Open -ccess Journal मध्ये प्रकाशित झाला.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहाय्यक प्रा श्रीमती कृष्णा कामत यांच्यासमवेत जोशी बेडेकर यांच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मानवी हक्कांबद्दल संबोधित केले. क्षितिजा चौधरी, श्रीराम गुप्ते या विद्यार्थांनी कायदेविषयक जागृती कार्यक्रमात सहभाग घेतला :


ठाणे, मंगळवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२३ वर्ष : १२, अंक : १८३, पाने : ४, किंमत : २ रुपये

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!

## तरुण पिढीला मूलभूत हक्कांची जाण असणे आवश्यक : प्रा. कृष्णा कामथ

ठाणे (मेधा भोईटे) : विद्या प्रसारक मंडळाच्या , ठामपा विधी महाविद्यालयाच्या, विधी सहायता केंद्रातर्फे जोशी बेडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क' याविषयी व्याख्यान घेण्यात आले. संविधानात नमूद असलेल्या मूलभूत हक्कांची जाणीव तरुण विद्यार्थ्यांना वेळीच करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विधी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका कृष्णा कामथ यांनी केले.

यावेळी भारतातील मूलभूत हक्कांच्या इतिहासाबद्दल सांगून, मूलभूत हक्क व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन याबद्दल विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी क्षितिज चौधरी, श्रीराम गुप्ते व सायली कुलकर्णी यांनी माहिती दिली. कार्यक्रमास चतुर्थी देशमुख, अपर्णा बोरकर आणि शुभम सरंगुले यांची उपस्थिती होती.

सत्र - V च्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण सत्र - V सबमिशन प्राप्त झाले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या न्यायालयीन भेट, वकील कार्यालय, टर्नशिपचा अहवाल दिला आणि ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये मूट कोर्ट्समध्ये हजर झाले.

## डॉ. वा.ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ऑक्टोबर २०२३ मधील कार्यक्रम / वार्ता**

५ ऑक्टोबर : डॉ. कांचन अक्षय यांनी जर्नल क्लब मध्ये ''अर्बन क्लॅप: इंडियाज लार्जेस्ट होम सर्व्हिस प्रोव्हायडर'' या विषयावर केस स्टडी चे सादरीकरण केले.

५ ऑक्टोबर : ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांनी प्राध्यापकांसाठी टर्निटिनच्या माध्यमातून साहित्य चोरीची तपासणी सॉफ्टवेअरचे एक सत्र आयोजित केले.

६, २६ आणि ३१ ऑक्टोबर : डॉ. महेश भानुशाली यांनी एमएमएस २३-२५ च्या अनुक्रमे चाणक्य, पराशर आणि वशिष्ठ तुकडीसाठी ''मुलाखत कौशल्य'' या विषयावर एक सत्र घेतले.

१० ऑक्टोबर : श्री. संजय सपकाळ, आयटीसी ग्रँड हॉटेल परेल येथे ''डिजिटल परिवर्तनाद्वारे संशोधन आणि शिक्षणाचे भविष्य मजबूत करणे'' या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय चर्चासत्राला उपस्थित राहिले.

११ ऑक्टोबर : कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) समितीने ''मेरी माटी मेरा देश'' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम आणि फेरीचे आयोजन केले.



१२ ऑक्टोबर : डॉ. स्मिता जपे यांनी ''साऊथ एशियन जर्नल ऑफ सोशल स्टडीज अँड इकॉनॉमिक्स'' या 'नियतकालिकांसाठी रिस्क मॅनेजमेंट' या शीर्षकावरील शोधनिबंधाचे समीक्षण पूर्ण केले.

१६ ऑक्टोबर : थिंक महाराष्ट्रच्या सहकार्याने आय क्यू एसी (IQAC) समिती तर्फे १६ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर दरम्यान ''लाइफ लाँग लर्निंग'' या विषयसुत्रावर आधारित व्याख्याने आयोजित करण्यात आली.




१७ ऑक्टोबर : सहा. प्रा. विशाल वेदक; मार्केटिंग आणि ऑपरेशन्सच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसह, ताज लँड्स एंड येथे आयोजित सी.आय.आय.- सप्लाय चेन जुगाड : पीपल इनोव्हेशन टेक्नॉलॉजी या कार्यक्रमात सहभागी झाले.




१९ ऑक्टोबर : ब्रिम्स च्या रोजगार नियुक्ती विभाग तर्फे डेल कार्नेजी ट्रेनर श्री. मंगेश वागळे यांच्या 'कम्युनिकेट इफेक्टिव्हली' या विषयावरील सत्राचे आयोजन करण्यात आले.



२० ऑक्टोबर : व्यवस्थापन विकास कार्यक्रम (MDP) प्रस्तावाची स्वीकृती

डॉ. स्मिता जपे यांच्या पुढाकाराने, जी पी. पारसिक बँकेकडून शाखा व्यवस्थापकांच्या ३ तुकड्यांसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम (MDP) आयोजित करण्याच्या प्रस्तावाला स्वीकृती मिळाली.

२१ ऑक्टोबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल (IIC) तर्फे "InnoSIP" या नावीन्यपूर्ण आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नवसंकल्पनांच्या उल्लेखनीय प्रदर्शनासाठी व्यासपीठ मिळवून देणे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पदवीपूर्व उन्हाळी उमेदवारी (समर - इंटर्नशिप) प्रकल्पांदरम्यान विद्यार्थ्यांना, कंपन्यांना / संस्थांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांना / आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा आव्हानांसाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधून देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा होती. विविध व्यवस्थापन अभ्यास संस्थातील २२ प्रतिभावान विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सहभाग नोंदविला.


InnoSIP २०२३ ने केवळ सहभागींची अपवादात्मक प्रतिभा दाखवली नाही तर आजच्या स्पर्धात्मक जगात नावीन्य आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे महत्त्वही अधोरेखित केले. या स्पर्धेने नवकल्पनांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ मिळाले आणि व्यवस्थापन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण भविष्याचा दाखला देखील दिला.




२६ ऑक्टोबर : विद्यार्थी विकास समिती (SDC) आणि आणि एडीसी (ADC) समितीने एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी MBTI सायकोमेट्रिक चाचणी आयोजित केली.




२९ ऑक्टोबर : डॉ. नीतिन जोशी, ३० किमी. अंतराच्या ''हिरानंदानी सायक्लोथॉन'' या सायकल राइड मध्ये सहभागी झाले. त्यांनी ९० मिनिटांत ही फेरी पूर्ण केली. सुमारे १८०० स्पर्धकांनी या फेरी मध्ये भाग घेतला होता.




•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006




# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**संपर्क**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.